जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ॐकार स्वरूप...

मदर म्हणून जगाच्या आदराचा आणि कौतुकाचा विषय असलेल्या फ्रेंच विदुषी मीरा रिचर्ड यांनी ५ तपे पाँडेचरित राहून साधना केली. योगी अरविंदांच्या महानिर्वाणानंतर त्या मुख्य मार्गदर्शक बनल्या. त्या म्हणत, ''ओम इज दि सिग्नेचर ऑफ दि लॉर्ड''. ओमकार ही विधात्याची साक्षात स्वाक्षरी आहे.

ॐकारपूर्वक केलेले कोणतेही कर्म सात्त्विक बनते. अंधारात दिवा किंवा रानात वाट दाखविणारा सोबती तसा ॐकार आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनीदेखील ज्ञानेश्वरीच्या आरंभी 'ओम नमोजी आद्या' असा ॐकाराचा जयजयकार केला आहे.

आपल्या जीवनाचा 'ॐकार' आपणच शास्त्रज्ञाच्यावतीने, तत्त्वज्ञानाच्या जिज्ञासेने आणि योग्याच्या आचारशीलतेने अभ्यासला पाहिजे. त्यासाठी प्रयोगशील झाले पाहिजे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

योगासने, दीघश्वसन, प्राणायाम या पायऱ्यांनी पुढे जात शास्त्रशुद्ध पद्धतीने ॐकार जपला पाहिजे म्हणजेच आपले ॐकार स्वरूप व्यक्तिमत्त्व आपल्याला उमजेल. आपले मोठेपण आपल्यालाच समजेल.

आपल्या दैनंदिन जीवनात, ग्रंथात, पारायण पर्वात, शुभकार्याच्या आरंभी अन् अंती ॐ शांती शांती शांती असा शांतीमंत्र जपात. सरस्वती, लक्ष्मी आणि श्रीशक्ती या ३ शक्तींचे आवाहन ॐकारामुळे घडते अशी श्रद्धा आहे. (जुन्या) दक्षता मासिकाचे संपादक व माजी पोलिस अधिकारी व. कृ. जोशी यांची गेलेली वाचा ॐकार उच्चारणाने परत आली होती.

# 'कृषीसेवक' पदासाठी प्राप्त अर्जाबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून 'मॅट'ची दिशाभूल

### माजी सैनिकांच्या राखीव जागा खुल्या वर्गातून भरण्याचा घाट, कठोर कारवाईची मागणी

नगर - कृषीसेवक पदाच्या नोकरभरतीत माजी सैनिकांसाठी राज्यभरात राखीव असलेल्या २६५ जागांसाठी सुमारे १५७ अर्ज दाखल झालेले असताना कृषी विभागाने केवळ ४७ माजी सैनिकांनी अर्ज दाखल केल्याची खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती 'मॅट' मध्ये सादर केली. माजी सैनिकांचे कमी अर्ज आल्याचे दाखवून रिक्त राहणाऱ्या राखीव जागा खुल्या वर्गातून भरण्याचे षड्यंत्र कृषी खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रचले असून, नोकरभरतीबाबत चुकीची माहिती देऊन मॅट न्यायालयाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी मॅटमधील अर्जदार उमेदवारांनी केली आहे.

यासंदर्भात माजी सैनिक पोपट दहिफळे, हरिश्चंद्र नागरे यांच्यासह ९ उमेदवारांनी मॅट न्यायालयाकडे अर्ज दाखल केला असून, कृषी खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मॅटमध्ये दिलेली माहिती आणि माहिती अधिकारातून मिळालेली माहिती यात मोठी तफावत असून, या माहितीच्या आधारे अधिकाऱ्यांनी मॅटची दिशाभूल केल्याचा आरोप पोपट दहिफळे यांनी केला आहे.

राज्य सरकारच्या कृषि विभागाने ऑगस्ट २०२३ मध्ये राज्यभरातील सर्व विभागवार कृषीसेवक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. या जाहिरातीनुसार माजी सैनिकांसाठी २६५ जागा राखीव होत्या. या राखीव जागांसाठी राज्यभरातून १५० ते १५७ माजी सैनिक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २० उमेदवार लेखी परीक्षेत पास होऊन त्यांना नियुक्त्या देण्यात आल्या. परंतु या परीक्षेत खुल्या वर्गातील उमेदवारांना उत्तीर्णसाठी जी गुणमर्यादा ठेवण्यात आली तीच गुणमर्यादा माजी सैनिकांच्या राखीव जागांसाठी ठेवण्यात आल्याने अनेक माजी सैनिक मेरीट लिस्टमध्ये आले नाहीत. त्यामुळे ९ उमेदवारांनी मॅटकडे धाव घेतली. या प्रकरणात प्रतिवादी असलेल्या कृषी विभागाचे अधिकारी यांनी मॅटमध्ये शपथपत्र दाखल करत खोटी माहिती सादर केली. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार २६५ जागांसाठी १५७ उमेदवारी अर्ज आले असताना न्यायालयात माहिती देताना संबंधित अधिकाऱ्याने केवळ ४७ उमेदवारी अर्ज आल्याची माहिती सादर करत माजी सैनिकांसह न्यायालयाची दिशाभूल करून फसवणूक केली आहे. माजी सैनिकांच्या आरक्षित जागा खुल्या वर्गातून भरण्याच्या उद्देशाने त्या रिक्त ठेवण्याचा घाट वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घातला आहे. आर्थिक आणि वैयक्तिक लाभासाठी राखीव जागा खुल्या वर्गातून भरण्याचे एक षड्यंत्र अधिकाऱ्यांनी रचले आहे. सर्व आठ विभागातून निवड झालेले २० आणि आलेले १३७ अर्ज असे एकूण १५७ अर्ज दाखल झालेले असतात. कृषी विभागाचे सचिव, आयुक्त, पुणे सहसंचालक यांनी 'मॅट' प्राधिकरणासमोर जाणीवपूर्वक खोटी माहिती देऊन १० डिसेंबरचे मॅटचे आदेश बदलून घेतले. या गंभीर प्रकाराबाबत मॅटने संबंधितांवर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी अन्यथा नाईलाजास्तव दिवाणी आणि फौजदारी कार्यवाही करावी लागेल, असा इशारा मॅटमध्ये अर्ज करणारे माजी सैनिक उमेदवार पोपट दहिफळे, हरिश्चंद्र नागरी, पितांबर धाडगे, सचिन पारखे, सुनिल घोलप, निलेश भुजबळ, कुमार मुंढे, गुरव भिष्मा, चंद्रकांत साखे आदींनी दिला आहे.

## भिंगारमध्ये गोडावून फोडून 'डीजे'च्या साहित्याची चोरी

नगर - भिंगार शहरातील नगर-पाथर्डी रोडवरील शौर्य हॉटेल शेजारी असलेले पत्र्याचे गोडावून फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ३ लाख ५९ हजार रुपये किंमतीचे डीजे चे विविध प्रकारचे साहित्य चोरून नेल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) सकाळी उघडकीस आली आहे. या गोडावून शेजारील दुकानही चोरट्यांनी फोडले मात्र तेथे काहीच चोरट्यांच्या हाती लागले नाही.

याबाबत सुनिल भानुदास सोनवणे (वय २५, रा. गवळीवाडा भिंगार) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा डीजे चा व्यवसाय असून त्याचे साहित्य ठेवण्यासाठी सम्राट ऑडीओ नावाचे पत्र्याचे गोडावून आहे. अज्ञात चोरट्यांनी गोडावूनच्या मागील बाजूचे पत्रे उचकटून आत प्रवेश करत त्यात ठेवलेले स्पीकर, ॲम्पलीफायर, लाईट, वायरिंग असे सुमारे ३ लाख ५९ हजार रुपये किंमतीचे डीजे चे विविध प्रकारचे साहित्य चोरून नेले. तसेच या गोडावून शेजारी असलेला अभिजित बाळू दहिहंडे यांच्या गाळा फोडला. परंतु तो सध्या रिकामा असल्याने तेथून फक्त एक गॅस टाकी चोरट्यांनी चोरून नेली असल्याचे सोनवणे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४), ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## माळीवाड्यात एकाची गळफास घेत आत्महत्या

नगर - शहरातील माळीवाडा परिसरातील एका लॉजमध्ये तिसऱ्या मजल्यावरील रूममध्ये ४२ वर्षीय व्यक्तीने सिलिंग फॅनला बेडशीट च्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) दुपारी घडली. विनोद विठ्ठलराव ताठे (वय ४२, रा. कोहिनूर गार्डन, माळीवाडा) असे मयताचे नाव आहे.


विनोद ताठे

विनोद ताठे यांनी गळफास घेतल्याचे समजल्यावर त्यांना बेशुद्धावस्थेत त्यांचे बंधू सचिन विठ्ठलराव ताठे यांनी दुपारी ३.४५ च्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ.विशाखा शिंदे यांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत विनोद ताठे यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुली, १ मुलगा, २ भाऊ असा परिवार आहे.

## घरासमोर लावलेल्या ऑटो रिक्षाची चोरी

नगर - घरासमोर लावलेली बजाज कंपनीची ऑटो रिक्षा (क्र.एम एच १६ सी ई ०९९८) कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी लॉक तोडून चोरून नेल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) पहाटे घडली.

याबाबत तय्यब हमीद पठाण (वय ३०, रा. हाजी इब्राहिम बिल्डिंग, इम्पिरियल हॉटेल मागे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांना सकाळी झोपेतून उठल्यावर त्यांची रिक्षा दिसुन आली नाही. त्यांनी रिक्षाचा नगर शहर परिसरात शोध घेतला. परंतु रिक्षा कोठेही दिसून आली नाही. असे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# नाताळनिमित्त कोठी परिसरात महानगपालिकेने स्वच्छता करावी

नगर - स्टेशन रोड येथील कोठी परिसरात नाताळ सणानिमित्त स्वच्छता करण्याच्याची मागणी स्वप्निल शिंदे यांनी मनपा प्रशासनाला केली असून नाताळ सण हे ४ ते ५ दिवसावर आले आहे. परंतु सदर परिसरात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गवत उगलेले आहे.


स्वप्निल शिंदे

कोठी परिसरातील क्रांती चौक ते इंदिरानगर येथील रस्ता देखील खराब झालेला असून महापालिकेच्या मार्फत मुरूम टाकण्यात यावा तसेच कोठी चौकात मुतारी असून या ठिकाणी साफसफाई होत नाही व अनेक वेळा महापालिकेत अर्ज सादर करून सुद्धा साफसफाई होत नसून याकडे कोणतेही कर्मचारी लक्ष देत नाही त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामूळे चांगल्या प्रकारे संपूर्ण परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी तसेच क्रांती चौकातील पुरुष शौचालय देखिल तुब्लेले असून तेथे सेफ्टी टँक ने घाण काढण्यात यावी तसेच या परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची समस्याकडे लक्ष देण्यात यावे तसेच मार्केट यार्ड रोड येथे माती व कचरा साचले असून महापालिकेमार्फत त्वरित काढण्यात यावे तसेच संपूर्ण परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात यावी.

कोठी परिसरात मोठ्या उत्साहाने नाताळ ख्रिसमस सण हा साजरा करण्यात येत असून लवकरात लवकर महापालिकेने साफसफाई कर्मचारी तेथे लावून या ठिकाणी घाण साफ करून औषध फवारणी करण्याची मागणी स्वप्निल शिंदे यांनी केली आहे.

## श्रीमती कमलाबाई लांडगे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - सर्जेपुरा, मिसाळगल्ली येथील रहिवासी कमलाबाई मधुकरराव लांडगे (वय ८०) यांचे २० डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पीएसआय गणेश जितेंद्र लांडगे यांच्या त्या आजी होत.

## श्रीमती मेमकोर त्रिलोकसिंग सेठी यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील श्रीमती मेमकोर त्रिलोकसिंग सेठी (वय ७९) यांचे २० डिसेंबर रोजी सायं.६ वा. छत्रपती संभाजीनगर येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात चार मुले, दिर, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. त्रिलोक सन्स ग्रुप ऑफ कंपनी, महाराष्ट्र वाईन्स व मॉडेल इंग्लिश स्कुलचे प्रवर्तक स.हिरासिंग सेठी, रतनसिंग, अमरदिपसिंग व डॉ.अजितसिंग सेठी यांच्या मातोश्री होत.

## भाऊसाहेब पा. भागडे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील निमगाव खैरीचे माजी सरपंच व निमगाव खैरी वि.वि. कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन भाऊसाहेब किसनराव पा. भागडे (वय ७५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, सहा मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



प्रवरा सह. साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर अभिजीत (अंबादास) भागडे व प्रगतशील शेतकरी मधुकर भागडे यांचे थोरले बंधू,श्रीरामपूर कृ. ऊ.बा.समितीचे संचालक नितीन भागडे, इंजि.निलेश भागडे व आर्यन भागडे यांचे चुलते होत.

## ओंकार औटी यांचे हृदयविकाराने दुःखद निधन

श्रीरामपूर - येथील वाटापूरचे माजी सरपंच ओंकार मुरलीधर औटी (वय ८५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



वाटापूर येथील शेतकरी बाळासाहेब औटी, दिगंबर औटी व लजपतरायवाडी, ता.श्रीरामपूर येथील जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व पाटणी मळा, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर येथील रहिवासी गोकुळ औटी (सर) यांचे वडील, शांतीलाल, कांतीलाल, दत्तात्रय, भाऊसाहेब, गिरीधर, संजय, विजय व रावसाहेब औटी यांचे चुलते, अमोल, विनायक, सचिन, अक्षय, विशाल व अथर्व औटी यांचे आजोबा होत.

# 'एटीएम'ला चिकटपट्टी लावून ४० हजार रुपयांची फसवणूक

### केडगाव येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मधील प्रकार, एका अनोळखी इसमावर गुन्हा दाखल

नगर - एटीएम मशीनला पैसे येण्याच्या मार्गावर पट्टी चिटकवून कोणीतरी अज्ञात चोरट्याने तीन बँक खातेदारांचे एकूण ४० हजार रुपये परस्पर काढून बँकेची फसवणूक केली. ही घटना केडगाव येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मध्ये दि.३० ऑक्टोबर रोजी रात्री १० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. या प्रकरणी शुक्रवारी (दि.२०) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की एसबीआय बँक केडगाव शाखेच्या बाजुला बँकेचे दोन एटीएम मशिन आहेत. बँकेचे खातेदार डिंपळे जे. लाड, प्रदीप सोंडकर, मंगल एस.निमसे हे ३० ऑक्टोंबर रोजी बँकेचे बाजुलाच असणारे एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेले.त्यांनी एटीएम मशिन मध्ये डेबिट कार्ड टाकून पैसे काढण्याची प्रोसिजर केली असता एटीएम सीआयजीए मधुन त्यांना पैसे मिळाले नाही. परंतु त्यांचे खात्यातून पैसे कट झाले. म्हणून तिघांनी बँककडे ऑनलाईन तक्रार नोंदविली.

त्यावर बँकेने त्यांचे खाते चेक केले असता डिंपळे जे. लाड यांनी दोन वेळा १० हजार काढण्यासाठी एटीएम मशिनमध्ये प्रोसिजर केल्याचे व प्रदीप सोंडकर यांनी एक वेळा १० हजार रुपये, तसेच मंगल एस. निमसे यांनी एक वेळा १० हजार रुपये एटीएम मधुन पैसे काढण्याची प्रोसिजर केल्याचे निदर्शनास आले. परंतु त्यांना एटीएम मधुन पैसे मिळाले नाहीत. त्यानंतर बँकेने एटीएम मशिन मधील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता दि.३० ऑक्टोंबर रोजी रात्री १० ते रात्री ११.३० वाजण्याचे दरम्यान एटीएम मध्ये एका अज्ञात इसमाने येऊन एटीएम मशीनला पैसे येण्याचे मार्गावर काहीतरी पट्टी चिटकवून निघुन गेला, त्यानंतर हे तिघे खातेदार त्याच एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी आल्याचे दिसुन आले. परंतु अज्ञात इसमाने एटीएम मशीनला पट्टी चिकटवल्या मुळे तीनही खातेदारांचे पैसे मशिन मध्ये अडकल्याने त्यांना पैसे मिळाले नाही. परंतु बँकेने त्यांना त्यांचे पैसे दिलेले आहेत. एटीएम मशीन मधुन पैसे न मिळाल्याने ते खातेदार एटीएम मधुन बाहेर गेल्यानंतर काही वेळाने त्याच अज्ञात इसमाने एटीएम मध्ये येऊन एटीएम मशीनला चिकटवलेली पट्टी काढून टाकली व ४० हजार रुपये परस्पर काढून घेतले. अशा प्रकारे एसबीआय बँकेची ४० हजार रुपयाची फसवणुक केली असल्याचे समोर आले.

त्यामुळे याबाबत एसबीआय. बँक, केडगाव शाखेच्या व्यवस्थापक अरुधंती पुजारी (रा.सावेडी, नगर ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# स्टेशन रोडवरील २ अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर छापे

### ३ लाख ६२ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त, ५ जणांवर गुन्हे दाखल

नगर - शासनाचा कोणताही परवाना नसताना भारत गॅस कंपनीच्या घरगुती गॅस टाक्या जवळ बाळगून लोकांच्या जिवास धोका निर्माण होण्याची शक्यता असताना गॅस टाकीतून गॅस काढून अन्य वाहनात भरणाऱ्या २ अवैध रिफिलिग सेंटरवर शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक यांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत गॅस टाक्या, ओमिनी व्हॅन, दोन पॅगो रिक्षा, रिफिलिंग मशीन असा ३ लाख ६२ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून ५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील स्टेशन रोडवरील खालकर हॉस्पिटल समोर पत्र्याच्या शेडमध्ये आणि स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळील रिफिलिंग सेंटरवर शुक्रवारी (दि.२०) दुपारी ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबतची माहिती अशी की पोलीस उप अधीक्षक अमोल भारती यांना महिती मिळाली की, कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खालकर हॉस्पीटल समोर, नगर पुणे रोडचे डावे बाजुला पत्राचे शेडमध्ये विनोद पोळ हा बेकायदेशीर रित्या, भारत गॅस कंपनीच्या घरगुती गॅस टाक्या जवळ बाळगून टाकीतून गॅस काढून तो एलपीजी वाहनात अनधिकृतरित्या रिफलींग करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने अमोल भारती यांनी पोलिस पथकास कारवाई करण्याचे आदेश दिले.

पथकाने त्या ठिकाणी जाऊन अचानकपणे छापा टाकला असता त्या ठिकाणी एक इसम पांढऱ्या रंगाचे ओमेनी व्हॅन व पॅगो रिक्षा या वाहनात रिफलींगच्या मोटार मशीन सह वजन काट्यावर घरगुती गॅस टाकी उलटी करुन त्यामधून ओमेनी व्हॅनमध्ये व रिक्षात गॅस भरताना मिळुन आला. पोलिसांनी त्यास त्यांचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विनोद मनोज पोळ (वय २४ रा. पाटील हॉस्पीटल शेजारी, कोठी) असे सांगितले तसेच तेथील ओमेनी व्हॅन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याचे नाव राजेंद्र भिमराज बडे (वय ३९ रा.बारदरी ता.नगर) व पॅगो रिक्षा चालकाने त्याचे


शहरातील स्टेशन रस्त्यावरील २ अवैध गॅस रिफलींग सेंटरवर कारवाई केल्यानंतर आरोपी व मुद्देमालासह पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांचे पथक.

नाव बबन नाथू कातोरे (वय ६० रा. अंबिका विद्यालय शेजारी, केडगाव) असे सांगीतले. त्या ठिकाणी काही भरलेल्या व काही मोकळ्या टाक्या मिळुन आल्याने विनोद पोळ यास घरगुती गॅस टाक्या वापरण्याचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने असा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले.

पोलिसांनी तेथून ३० हजार रुपये किमतीची गॅस रिफलिंग मशीन, ४५ हजार ५०० रुपये किमतीच्या भारत गॅस कंपनीच्या १३ सीलबंद घरगुती वापराच्या गॅस टाक्या, ३ हजार ५०० रुपये किमतीची १ हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीची लाल- निळया रंगाची सीलबंद घरगुती वापराची गॅस टाकी, ६ हजार रुपये किमतीच्या भारत गॅस कंपनीच्या २ अर्धवट भरलेल्या गॅस टाक्या,५ हजार ४०० रुपये किमतीच्या २ भारत गॅस कंपनी असे लिहिलेल्या व सील नसलेल्या गॅस टाक्या, ८० हजार रुपये किमतीची ओमेनी व्हॅन,(क्र.एम एच २३ ई ७४१२), ५० हजार रुपये किमतीची पॅगो रिक्षा (क्र.एम एच १६ बी सी ०४८२), ६ हजार रुपये किमतीचा अटारी कंपनीचा १ वजनकाटा, व १ लोखंडी काटा, असा २ लाख २६ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी विनोद पोळ, राजेंद्र बडे, बबन कातोरे यांना कोतवाली पोलीसांच्या ताब्यात दिले.

दुसऱ्या कारवाईत स्टेशन रोडवरील जुन्या लोखंडी पुलावरुन मल्हार चौकाकडे जाताना शुभम मेन्स पार्लरच्या पाठीमागील पत्राचे शेडमध्ये बेकायदेशीर रित्या शासनाचा कोणताही परवाना नसताना भारत गॅस कंपनीच्या घरगुती गॅस टाक्या जवळ बाळगून गॅस टाकीतून गॅस काढून तो एलपीजी वाहनात रिफलींग करणाऱ्या सेंटरवर पोलीसांनी छापा टाकून एकास ताब्यात घेतले. विठ्ठल राजु पारधे (वय १९ रा.मल्हार चौक, अ.नगर) असे त्याचे नाव आहे. तर तेथे आढळलेल्या पॅगो रिक्षा चालकाने त्याचे नाव अनिल मुकुंद भिंगारदिवे (वय-५५ रा. माळीवाडा, झेड पी समोर) असे सांगीतले.

पोलीसांनी तेथून ३० हजार रुपये किमतीची एक गॅस रिफलींग मशीन, ३१ हजार ५०० रुपये किमतीच्या भारत गॅस कंपनीच्या ९ सीलबंद घरगुती वापराच्या गॅस टाक्या, ३ हजार रुपये किमतीची भारत गॅस कंपनीच्या १ अर्धवट भरलेल्या घरगुती वापराच्या गॅस टाक्या, १८ हजार ९०० रुपये किमतीच्या ७ भारत गॅस कंपनीच्या गॅस टाक्या, ५० हजार रुपये किमतीची पॅगो रिक्षा (क्र.एम एच १४ सी ई ०५६६), ३ हजार रुपये किमतीचा युनिटेक कंपनीचा १ वजनकाटा असा १ लाख ३६ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८७,२८८,१२५ सह अत्यावश्यक वस्तु कायदा १९९५ चे कलम ३ व ७ प्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलीस अंमलदार राजीव जाधव, महेश मगर, संतोष ओव्हाळ, हेमंत खंडागळे, सागर द्वारके यांनी केली.

# गृहिणी

## आरोग्य

### वजन कसे कमी कराल?

जास्त वजन असणाऱ्या तरुणींनी व्यायामाबरोबर खाण्या-पिण्याकडेही लक्ष द्यावे. दोरीवरच्या उड्या मारणे, जोरात चालणे, सायकलिंग करणे, पायऱ्या चढणे-उत्तरणे इ. उपाय करावे. वजन कमी करण्याचा उत्तम उपाय म्हणजे सकाळी पायी फिरणे. यामुळे शुध्द हवा मिळते तसेच रक्तप्रवाह नॉर्मल होतो. त्याचसोबत कोमट केलेले पाणी प्यावे.

## पाककला

### सोया टिक्की

**पारीसाठी** - १ कप सोयाबीनची डाळ, अर्धा कप किसलेला नारळ, २ बटाटे उकडलेले, १ मोठा चमचा रवा, ४-५ चिरलेल्या हिरव्या मिरच्या, १ मोठा चमचा चिरलेली कोथिंबीर, १ लहान चमचा गरम मसाला, १ लहान चमचा चाट मसाला, तळण्यासाठी तेल, मीठ चवीनुसार.

**कृती** - डाळ १ तास पाण्यात भिजवा. नंतर मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. एका भांड्यामध्ये बटाटे स्मॅश करून त्यात मिरची, कोथिंबीर, गरम मसाला, नारळ, मीठ घालून टिक्कीचा आकार द्या. डाळीच्या मिश्रणात मीठ आणि चाट मसाला घालून टिक्कीला लावा आणि नंतर रव्यामध्ये घोळून शॅले फ्राय करा. कांदा आणि टोमॅटोच्या कापांनी सजवून गरमागरम सर्व्ह करा.

## सौंदर्य

### केस गळणे कमी होण्यासाठी

* भोजनाला स्वाद देणारा कांदा एक उत्तम औषधही आहे. मोहरीच्या तेलात कांद्याचा रस मिसळून मालिश करण्याने संधिवातामध्ये फायदा होतो. केस गळत असल्यास त्या भागावर कांद्याचा रस रगडल्यास गळणे बंद होते.

* देशी लाल गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात थोडेसे ग्लिसरीन मिसळून दाट लेप बनवून रात्री झोपताना ओठावर लावा. यामुळे ओठावर लाली येते.

## वास्तू

नैर्ऋत्य कोपऱ्यातील वास्तुदोष नष्ट करण्यासाठी त्या क्षेत्रात अवजड सामान ठेवावे तसेच घरातील निरुपयोगी सामानही याच क्षेत्रात ठेवावे.

## सल्ला

कांद्याची पेस्ट लावल्याने टाचांच्या भेगा बऱ्या होतात. झोपेची तक्रार असल्यास रात्री कांद्याची कोशिंबीर खावी. भूक लागत नसल्यास तसेच भूक वाढविण्यासाठी छोटासा कांदा भाजून मधाबरोबर खावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २२ डिसेंबर २०२४

**भानुसप्तमी, कालाष्टमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, उत्तरा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०६ वा. १४ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : वैवाहिक आयुष्य आजच्या इतके सुखद कधीच नव्हते, याची प्रचिती तुम्हाला येईल.

**वृषभ** : ज्यांची किंमत वाढतच जाणार आहे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी आजचा दिवस शुभ आहे. शत्रू प्रभावहीन होतील.

**मिथुन** : तुमच्या हृदयाला आवाहन करतील अशा एखाद्या व्यक्तीशी भेट होण्याचा जबरदस्त योग आहे. मान-सन्मानात वाढ होईल.

**कर्क** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. दिवस आनंदात व्यतीत होईल. आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**सिंह** : शत्रू पराभूत होतील. आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**कन्या** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**तूळ** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**वृश्चिक** : आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात. त्या योजना पुर्णत्वास येतील.

**धनु** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

**मकर** : आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. मानसिक स्थिरता वाढेल.

**कुंभ** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

**मीन** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


**शिक्षक** : तुझे नाव दीपक आहे आणि तुझ्या बुद्धीत अज्ञानाचा एवढा अंधार कसा?
**विद्यार्थी** : सर ''दिव्याखालीच अंधार असतो ना गुरुजी!''

## जागतिक आश्चर्ये

*✻ बॅबिलॉनच्या तरंगत्या बागा (उद्याने) दुसऱ्या नेबुचाडनेझरने त्याच्या पत्नीच्या ईच्छेखातर बांधल्या. त्याच्या सुंदर पत्नीस वृक्षांची व सुवासिक झाडाझुडपांची खुपच आवड होती.*

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७६ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०७५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) आव; प्रतिष्ठा ५) फायदा; लाभ ७) प्रयोजन; निमित्त; सबब ८) स्वाद; गोडी; चव ९) वाव; संधी ११) जेथे कामगारांद्वारे वस्तू उत्पादित केल्या जातात ती जागा १२) पक्षघात; अर्धांगवायू १४) योग्य; वाजवी १५) मच्छर; मशक १६) मुलगा; पुत्र; पूत; सुत १९) घोडे जोडलेले देवादिकांचे वाहन २०) जंगलाला लागलेली आग; दावानल २२) मिलाफ; मीलन; संयोग २३) वाट; मार्ग; रस्ता २४) उंट हकणारा

**उभे शब्द :-** १) ज्याचे मोल करता येत नाही असा २) एक वाद्य; नौबत; मोठा नगारा ३) फणसाची एक जात ४) मध्यान्हीची भयंकर उष्णता ५) अर्जुन व श्रीकृष्ण ६) जमीन उकरण्यासाठी कुळवाला लावतात ती लोखंडी पट्टी; पाश १०) चिंधीला पीळ देऊन बनविलेली वात १३) भास्कर, रवि; सूर्य १७) अलीकडचा; ताजा १८) सहा ऋतूंपैकी एक ज्यात झाडांना नवीन पालवी फुटते २१) वाद्य वाजविण्याची क्रिया २३) एका हाताची ओंजळ

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : विवेकी मनुष्याला जीवनात सुखच दिसेल. अविवेकी व्यक्तीला जीवनातील दुःखच दिसले, तर त्यात नवल कोणते?

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### घटसर्प म्हणजे काय?

कॉरीनबॅक्टोरियम डिप्थेरी नावाच्या जिवाणूमुळे घटसर्प हा रोग होतो. पूर्वी ह्या रोगामुळे हजारो बालके मृत्युमुखी पडत. पण आजकाल या रोगाचे फार कमी रूग्ण आढळून येतात. याचे कारण म्हणजे या रोगावर प्रभावी लस उपलब्ध आहे. घटसर्प हा लहान मुलांमध्ये होणारा गंभीर आजार आहे. या आजाराची सुरुवात बारीक ताप, अंगदुखी, घसादुखी या लक्षणांनी होते. यात घशात किंवा टॉन्सिलवर पांढरट करडा पडदा तयार होतो व तो त्या भागांना चिकटून बसतो. हा पडदा काढण्याचा प्रयत्न केल्यास तेथून रक्तस्त्राव होतो. बऱ्याचदा घशात अवधाण येऊन गळा सुजतो. गिळण्याची क्रिया मंदावल्याने तोंडातून लाळ गळत राहते. या आजारात हृदय, मेंदू इत्यादी अवयवांवर जिवाणूंच्या विषाचा परिणाम होऊन मूल दगावण्याची शक्यता असते. घटसर्प हा रोग श्वासावाटे एकापासून दुसऱ्याला होतो. त्यामुळे रोगप्रसार टाळण्यासाठी रुग्णाने खोकताना तोंडावर रुमाल ठेवावा. घटसर्पाच्या उपचारात अँटीडिप्थेरिया (घटसर्प) सिरम, पेनिसिलीन, किंवा एरिथ्रोमायसीन या औषधांचे खूप महत्त्व आहे. उपचार न घेणाऱ्या १० टक्के रुग्णांचा या रोगामुळे मृत्यू होतो. घटसर्प हा गंभीर आजार असला तरी प्रभावी लस उपलब्ध असल्याने त्याचा सहजगत्या प्रतिबंध करता येतो. यासाठी त्रिगुणीची लस दीड महिने, अडीच महिने, साडेतीन महिने, या वयात बालकाला द्यावी व नंतर दीड वर्षे व ५ वर्षे असताना त्रिगुणीचा बूस्टर डोस अनुक्रमे द्यावा.

### राजा जनक आणि ऋषि अष्टावक्र

राजा जनक राजा असूनही त्यांना राज वैभवात आसक्ती नव्हती. लोभ मोहापासून ते सदैव दूर राहत. विनम्रता त्यांच्या स्वभावात होती. त्यामुळे ते आपले दोष दूर करण्याचा प्रयत्न करत असत. आत्मशोध घेण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न सुरुच असे.

एकदा ते नदीकाठावर एकांतात बसून 'सोऽहम' चा जप करत होते. मोठ्या आवाजात त्यांचा जप सुरु होता.

तेवढ्यात तेथून अष्टावक्र ऋषि चालले होते. ते परमज्ञानी असल्याने त्यांना राजा जनकाचा जप ऐकून ते जागेवरच थांबले व एका हातात छडी घेऊन थोडे दूर अंतरावर उभे राहिले. मग मोठ्या आवाजात तेही बोलू लागले,''माझ्या हातात कमंडलू आहे आणि माझ्या हातात छडी आहे'' राजा जनकाच्या कानात ऋषींच्या बोलण्याचा आवाज गेला पण त्याने आपला जप सुरुच ठेवला.

अष्टावक्रही ही गोष्ट जोरजोरात बोलत राहिले. शेवटी जनकाने जप थांबवून विचारले, ''मुनिवर, हे तुम्ही मोठमोठ्याने काय सांगत आहात'' अष्टावक्र जनकाकडे पाहून हसले आणि म्हणाले, ''माझ्या हातात पाण्याचा कमंडलू आहे, माझ्या हातात छडी आहे''

राजा जनक आश्चर्यात पडला व विचारू लागला, ''महाराज अहो हे तर मलाही दिसत आहे की तुमच्याजवळ छडी आणि कमंडलू आहे पण हे दिसत असतानासुद्धा तुम्ही मोठ्याने ओरडून का सांगत आहात.''

तेव्हा अष्टावक्रांनी जनक राजांना समजाविले,'' राजन, माझ्याजवळ असणारा कमंडलू आणि छडी दिसत असतानासुद्धा ओरडून सांगणे हे जसे मूर्खपणाचे आहे तसेच तुमचे सोऽहम उंच आवाजात म्हणणे आहे. मंत्राला घोकण्याने काहीच फळ मिळत नाही. मंत्र आत्मसात करणे किंवा त्याला आतल्या चेतनेशी जोडल्यावरच त्याचे फळ मिळते.''

**तात्पर्य** : कोणतेही ज्ञान घोकंपट्टी करून मिळवण्यापेक्षा ते आत्मसात करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कोरडे पाठांतर काहीच कामाचे नसते.



## रहमते दर्शन (भाग - १)

### दर्शन : दिलों के जानने वाले

मुझे नामदान लिए हुए लगभग ६ महीने हो चुके थे लेकिन कोई अनुभव नहीं मिला था। एक दिन मेरे दिल में आया कि महाराज जी कहते हैं कि गुरु जब शिष्य को नाम देता है तो वो उसके अन्तर में बैठ जाता है। एक दिन कृपाल आश्रम में जब महाराज जी सत्संग समाप्त करके स्टेज से उतर कर संगत में आये, तो मैंने सोचा कि मैं महाराज जी से बात करूँगा कि अगर वो मेरे अन्तर में बैठें हैं, तो दूर से इशारा कर दें, तब तो ठीक है। अगर नहीं किया, तो आज के बाद यहाँ आश्रम कभी नहीं आऊँगा और मीट व शराब फिर से खाना शुरू कर दूँगा। जब महाराज जी संगत में आये, तो मैं दूर ही खड़ा रहा।

महाराज जी ने मेरी ओर आँखों से इशारा किया, तो मैंने समझा कि किसी और के लिए यह इशारा किया है। उन्होंने फिर बड़ी ज़ोर से गर्दन हिलाकर इशारा किया और तब तक इशारा करते रहे जब तक मैंने उनके इशारे का जवाब नहीं दिया। मेरे दिल को तसल्ली हो गई। तब मैंने हाथ जोड़ कर महाराज जी को इशारा किया कि आप पूर्ण महापुरुष हैं। फिर मैंने अपने दिल में फ़ैसला कर लिया कि सारी दुनिया बाद में और महाराज जी सबसे पहले। एक बार मैं अपने घर में ध्यान पर बैठा हुआ था तो ध्यान बिल्कुल नहीं लग रहा था। मैं काफी परेशान था और मैं रोने लगा।

तभी अचानक बैठे ही बैठे मुझे उभार मिलने लगा, मैं घबरा गया और उसी वक्त अपने कान पकड़े और हाथ जोड़ कर प्रार्थना की कि आज के बाद कभी नहीं कहूँगा कि भजन नहीं बनता क्योंकि मुझे नहीं मालूम था कि ध्यान में क्या हालत होती है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

आगे पीछे हमें ज्ञान याद रहता है। हमारा दिमाग किसी भी बात को नहीं भूलता। हम ने जो कुछ भी देखा, सुना व बोला है वह दिमाग में रिकॉर्ड हो जाता है। बस समस्या यह है कि समय पर बात याद नहीं आती।

दिमाग की सब से बड़ी समस्या है समय पर ज्ञान भूल जाता है। किसी भी चीज को याद रखना हो तो हमें एकाग्रता की जरूरत होती है। एकाग्रता तब आती है जब हमारी उस काम में इच्छा हो, रूचि हो, लगन हो। रूचि तब होगी जब हमारा उस से संबन्ध हो। आप बाजार जा रहे है और रास्ते में कोई आक्सिडेंट हुआ देखते हैं, आप आगे निकल जाते हैं। थोड़ा आगे जाने पर आप को पता लगा कि आप के पड़ोसी का एक्सीडेंट हुआ है। आप के मन में उस से संबन्ध निकल आया। आप वापिस आ कर उसकी मदद करते हैं।

बिल्कुल अलग अद्भुत या अजीबो गरीब बातें हमारे दिमाग में ज्यादा लंबे समय तक रहती हैं। किसी साधारण चीज को अनोखा बना कर उसे लम्बे समय तक याद रख सकते हैं। आप किसी व्यक्ति के चेहरे को देख कर तो पहचान लेते हैं परंतु उसका नाम याद नहीं आता। कई बार किसी व्यक्ति का नाम तो याद रहता है परंतु चेहरा बदला बदला सा लगता है। हम जिन चीजो को अच्छी तरह देखते हैं उन्हें देर तक याद रखते हैं। कोई बात भूल न जाए इसलिए क्लास में नोट्स बनाते रहते हैं। फिल्म देखते हैं तो नोट्स बनानें की जरूरत नहीं पड़ती। फिल्म में दिखाई जा रही घटनाओं को हम क्रम रखते हैं। हम याद रखते हैं किस सीन से आगे क्या हुआ और उसके आगे क्या हुआ। यही एकाग्रता है। एकाग्रता का संबन्ध नींद से भी होता है। सोते समय भी हमारा दिमाग जागता रहता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'अत्यल्प... अल्प... थेंब'

थेंब. पाण्याचा अत्यल्प भाग. थेंब शब्द उच्चारला की पाऊस डोळ्यांसमोर दिसतो. थेंब रुपात जमिनीवर पडणारा. पाणी म्हणजे जीवन. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा काटकसरिनं उपयोग करणं, आज गरजेचं आहे. थेंबे थेंबे तळे साचे हे अगदी खरं आहे.

अनेकजण दुचाकी, चारचाकी वाहनांमुळं खुपच आळशी झालेत. अगदी जवळ जायचं असेल तरी दुचाकीवर अथवा चारचाकीत जातात. पेट्रोलचा थेंब सुध्दा महत्वाचा आहे. दोन, चार किलोमीटर अंतराकरिता पायी अथवा सायकलवर जाणं सहज शक्य आहे. ह्यामुळेच पेट्रोलची बचत होईल. चालण्याचा अथवा सायकलिंगचा व्यायाम होईल, धुराचं आणि ध्वनीचं प्रदुषण होणार नाही. पेट्रोलचा हा अत्यल्प भाग पैश्यांची बचत करण्याची सवय लावेल. रक्तदात्याव्यक्तीचं नेहमीच कौतुक वाटतं. रक्ताचा थेंबसुध्दा अत्यंत महत्वाचा आहे. रक्तदान, सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानामुळं, एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचतात. रक्तदानाचं सत्कार्य मनस्वी समाधान देणारं असतं. आपल्याच्याने रक्तदान करणं शक्य नसेल तर रक्तदात्यांचा सन्मान करणं नक्की शक्य आहे. हे केलंच पाहिजे. थेंब असो पाण्याचा, पेट्रोलचा अथवा रक्ताचा आपल्यासाठी अमूल्य आहे. आज केलेली पैश्यांची बचत भविष्यात उपयोगी पडतेच. एक रुपया असो की पन्नास रुपये, खरं तर हे दोन्हीही पैश्यांचा अत्यल्प भाग. प्रत्येक सेकंद हा वेळेचा अत्यल्प भाग अर्थात वेळरुपी थेंब. ह्या प्रत्येक सेकंदाचा उपयोग कसा करणार आहे, ह्यावरुनच ठरणार आहे भविष्यात नेमकी कशी वेळ येणार आहे हे. सकाळी उठताक्षणी एकाच वाक्याचा विचार केला 'आजचा दिवस माझ्यासाठी चांगलाच असणार आहे.' दिवसाच्या सुरुवातीचा हा अत्यल्प सकारात्मक विचाररुपी थेंब, प्रसन्न ठेवणार आहे. हातुन चांगली कृती घडण्यासाठी सहाय्यकारी असणार आहे.

पोलिओमुक्त भारत करण्यासाठी, 'दो बुंद जिंदगी के' पाच वर्षांपर्यंतच्या बाळानं घेणं महत्वाचं आहे. फक्त दोन थेंबांचं किती महत्व आहे हे आपल्या लक्षात येईल. काहींच्या दृष्टीने थेंब अगदीच नगण्य असेल, पण अत्यंत महत्वाचा आहे हे अनुभवांती लक्षात येतं. कोणतीच गोष्ट, विचार, कृती नगण्य, अत्यल्प नसते तर तुम्ही त्याकडे कसं पाहता ह्यावर अवलंबून आहे. थेंबांचं, आपलं स्वतःचं अस्तित्व आहेच. रक्ताचा प्रत्येक थेंब, आपलं पृथ्वीवरच अस्तित्व टिकवुन ठेवतो. थेंब म्हणून, आपण थेंबाला कमी लेखु शकणार नाही, तर तो आहे म्हणूनच आपण आहोत, असं मनापासून म्हणुन थेंबाप्रति कृतज्ञ राहुया. एखादा नगण्य वाटणारा विचार, एखादी नगण्य वाटणारी कृती, आपलं भविष्य चांगल्या अर्थाने बदलवु शकते.

पाऊस रुपात बरसतांना थेंबांनी विचारलंच, मला आडवतोस, जिरवतोस की नाही? पावसाचं पाणी अडवणं, जिरवणं गरजेचं - महत्वाचं आहे. भविष्यात पाण्याचं संकट नको असेल तर, पावसाचं पाणी अडवलं, जिरवलं पाहिजे. रक्ताच्या थेंबांनीही विचारलं, रक्तदान करतोस की नाही ? रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे ह्याचा अनुभव रक्तदान करुनंच घेता येईल. मनीबँक ह्या लहानशा डब्यात आपण एक रुपया अथवा दोन, पाच रुपये दररोज टाकले तर जमा झालेली रक्कम, आपल्यासाठी भविष्यातील आर्थिक तरतुद असणार आहे. कोणत्याच विचार, कृतीला कमी लेखायचं नाही. तो विचार, लहानसा असेल. कृती अल्प असेल तर महत्वपूर्ण असतेच. झोपेतुन ऊठताक्षणी, मिळणारा दिवस हा एक वर्षातील एकुण दिवसांपैकी अल्प भाग आहे. मिळालेल्या ह्या दिवसाचा उपयोग स्वतःसह इतरांचं भलं करण्यासाठीही केलाच पाहिजे. मी, मला, माझं हा अल्पसा नकारात्मक विचार आहे फक्त स्वार्थीपणाचा. ह्या अल्प स्वार्थामुळं प्रगती नक्कीच होईल पण समाजासाठी काहीच करु शकणार नाही. एखाद्या व्यक्तीकडे दहा रुपये आहेत, त्याने त्यापैकी अल्पसा भाग असणारे पन्नास पैसे गरजु व्यक्तीला दिले तर आनंद होईल, गरजुची, गरजपूर्ण होईल. एखाद्या व्यक्तीनं विचारलं की तुझ्याविषयीची माहिती सांग. हे विचारणं अगदी अल्प - तीनच शब्दांत आहे. माहिती सांगतांना स्वभाव, आवड, छंद, विशेषगुण ह्यासोबतंच सध्या काय आहोत, भविष्यात काय व्हायचं आहे अर्थात स्वप्न काय आहे ? ध्येय काय आहे ? ह्याविषयी सांगता येईल. अत्यल्प असते, अल्प असो की थेंब असो, खुप काही सांगणारा, शिकवणारा असतोच. चांगलं तेवढं घ्यायचंच.

(लेख क्र.५३०)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण


त्यामध्ये चेहऱ्याला, केसांना मडपॅक लावावा तसेच दर्वांकर हेअर ऑईल, दुर्वांकुर शाम्पू पावडर यांचा वापर करावा. तसेच टोमॅ। काकडी यांचा रस चेहऱ्याला लावावा. तसेच दुधाच्या मलईत लिंबू पिळून ते चेहऱ्याला लावावे. श्श सज: गर्भावस्थेमध्ये रक्तात ५०% वाढ झाल्याने शरीरातील दवाचे प्रमाण वाटते - त्यामळे रक्त पातळ होत. ह वाढलेले द्रव शरीराच्या सर्व भागांमध्ये है. त्यामळे गर्भावस्थेच्या शेवटच्या काळामध्ये पायांवर थोडी सज येणे स्वाभाविकच असते; परंतु संपूर्ण अंगावर सूज येणे हे धोक्याचे असते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# आर्कीटेक्चरल ३ डी व्ह्यू आजच्या काळातील आवश्यकता








**३ डी व्ह्यू म्हणजे काय?** ३ डी व्ह्यू म्हणजे काय? हे सांगण्याआधी मला, मी बालपणी पाहिलेली एक कार्टून फिल्म आठवली. चार व्यक्तीच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यांना एका हत्ती समोर उभा करून, ती काय वस्तू आहे ते ओळखायला सांगितले. एकाने हत्तीच्या पायाला हात लावून तो खांब असल्याचे सांगितले. एकाला शेपटीचा दोरखंड वाटल. एकाने कानाला स्पर्श करून ते धान्य निवडण्याचे सूप आहे असे सांगितले. पण तो हत्ती आहे हे कुणालाच ओळखता आले नाही. तो हत्ती आहे अगदी हीच गोष्ट घराच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते. तो ईमारत रुपी हत्ती उभा करून दाखवण्याचे तंत्र म्हणजेच ३ डी व्ह्यू होय.

आपण बऱ्याचदा २ डी हा पण शब्द ऐकला असेल. २ डी म्हणजेच२डायमेंशनल (द्वि मितीय)– आपण कागदावर त्रिकोण, चौकोन, वर्तुळ इत्यादी काढतो. त्यांना लांबी आणि रुंदी असते. अर्थात कागदावर काढलेले सर्व आकार २ डी मधे मोडतात. ३ डी म्हणजेच २डायमेंशनल (त्रिमितीय)– लांबी, रुंदी आणि उंचीचा समावेश होतो. उदाहरण द्यायचे झाले तर लाकडी ठोकळा, काचेचे प्रिझम. आता तुम्ही म्हणाल की कागदावरपण आपण ३ डीकाढू शकतो, पण तो प्रकार परस्पेक्टिव यांप्रकारात मोडतो.

**परस्पेक्टिव व्ह्यू :** आपण याला दृष्टीकोन म्हणू शकतो. एखादी वस्तू हातात घेऊन पाहिल्यास आणि दुरुन पाहिल्यास वेगवेगळ्या आकाराची वाटते. त्याचप्रमाणे एखादी ईमारत आपल्याला निरनिराळ्या कोनांमधून आणि अंतरावरून वेगळी भासते. यांचा समर्पकतेने वापर करत ३ डी व्ह्यू बनविले जातात.

पूर्वी कार्ड बोर्ड वापरून इमारतींची स्केल मॉडेल बनविली जायची. आजही काही प्रमाणात यांचा वापर होतो. त्यासाठी लागणारा वेळ, पैसा याचे गणित जुळत नाही. म्हणजेच ते परवडणारे नाही, आणि त्यात बदल करणे केवळ अशक्य आहे.

अहिल्यानगरमध्ये ३ डी व्ह्यूज तयार करून घेण्याला सुरूवात साधारणपणे इसवी सन २००० साली झाली. खूप मोजकीच लोक या क्षेत्रात काम करीत होती. त्यापैकी मी एक आहे. सुरुवातीस काम करण्यास उपलब्ध सॉफ्टवेअर, मार्गदर्शक. तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर अश्या अनेक अडचणी होत्या. परंतु अहिल्यानगर मध्ये हे तंत्रज्ञान विकसित करून पुणे अथवा इतर ठिकाणी क्लाएंट ची होणारी ससेमिरव थांबविण्याच्या हेतूने आम्ही काम सुरु केले आणि चांगली सेवा सर्व नगरकरांना देऊ शकलो यांचे नक्कीच समाधान आहे.

**३ डी विषयी विस्तृत माहिती :**

३ डी व्ह्यू हा आजकाल बराच प्रचलित झालेला आणि कानावर पडणारा शब्द झाला आहे. कोणीही घराचे बांधकाम अथवा स्कीम करणार आहे असे सांगितल्यावर लगेचच समोरील व्यक्ती ३ डी बनवला असेल तर दाखव? हा प्रश्न उपस्थित करते. आपल्या स्वप्नातील घराची पूर्तता करताना अथवा काम सुरु करण्याआधी ते झाल्यावर नेमके कसे दिसेल आणि आपल्याला अपेक्षित बदल त्यात करायचे असतील तर त्यासाठी ३ डी व्ह्यू बनवणे हा साधा आणि अतिशय सोपा पर्याय आपल्याकडे आता उपलब्ध झाला आहे.

३ डी व्ह्यू माध्यमातून आपण आर्किटेक्चर कडून उपलब्ध प्लॅन आणि इलेव्हेशन याचा वापर करून त्रिमितीय म्हणजेच ३ डी इमेज योग्य सॉफ्टवेअरचा वापर करून बनवलेली पाहू शकतो. यामुळे कसलेही तांत्रिक शिक्षण नसलेल्या व्यक्तीला चित्राच्या माध्यमातून आपला बंगला अथवा इमारत पूर्ण झाल्यावर कशी दिसेल याचा अंदाज येतो. नाईट व्ह्यू, कट सेक्शन, बर्ड व्ह्यू या माध्यमातून अपार्टमेंट मधील विक्री करणेस सेल्स अथवा मार्केटिंग विभागास उपयुक्त अशी मदत होते. इंटेरीअर काम करतानाइंटेरीअर डिझायनर कट सेक्शन, फर्निचर डीटेल्स, पी ओ पी डीटेल्स साठी या तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग होतो. तसेच कमर्शिअल इमारतीची विक्री करण्यास होल्डिंग वर थ्री डी व्ह्यू असेल तर त्याची प्रभावी मांडणी करण्यास ग्राफिक डिझायनर यास सहज शक्य होते.

थ्री डी माध्यामतून त्यातील वेगवेगळ्या गॅलरी मधील नवनवीन मटेरीअल वापरून आतील फर्निचर व्यवस्था / मांडणी तसेच लॅंडस्केप आकर्षक पद्धतीने दर्शविता येते. त्यामुळे थ्री डी व्ह्यू चा फक्त इमारत इलेव्हेशन दाखवण्याबरोबरच वरील गोष्टींसाठी उपयोग होतो.

थ्री डी मुळे इमारत पूर्ण झाल्यावर कशी दिसेल याचा अंदाज क्लाएंटला तर येतोच परंतु त्यावरून काही बदल आवश्यक असतील तर ते करणेही सोपे जाते. थ्री डी व्ह्यू मुळे साईटवर प्रत्यक्ष काम करणारे इंजिनिअर्स, ठेकेदार आणि मिस्तरी यांचेही काम सोपे होऊन अनावश्यक चुका टाळण्यास मदत होते. त्याच बरोबर कमर्शिअल स्कीम मध्ये कस्टमरला आपण बुक करणार असणाऱ्या इमारतीचे बाह्यरूप आणि कट व्ह्यू माध्यमातून अंतर्गत रूप सहज लक्षात येते.

**३ डी क्षेत्रात काम करण्यास भवितव्य :** आज आर्टिफीसीअल इंटेलिजेन्स (ए आय) च्या जमान्यात या क्षेत्रात अमूलाग्र बदल झालाय. बीमरेविट, ऑटोकॅड, ३ डी मॅक्स, लुमियन, स्केचअप यासारखी बरीच सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. आपल्याला असंख्य ऑप्शन / पर्याय करून पहाता येतात. घर बांधून तयार होण्याआधीच ते आपण आतून आणि बाहेरून फिरून बघू शकतो. त्यांचे रंग, टेक्सचर आपण बदलून पाहू शकतो. हे तयार करण्यात तुलनेने कमी वेळ लागतो.

या क्षेत्रात नव्यानेच आलेल्या वास्तुविशारद मित्रांना हे सॉफ्टवेअर्स एक वरदानच ठरणार आहे. बीमरेविट हे सॉफ्टवेअर तर जगमान्य झाले आहे. ते आत्मसात केल्यावर स्काय इज दी लिमिट असे विविध पर्याय उपलब्ध आहेत. आपली कल्पनाशक्ती वापरून आपण त्यात पाहिजे ते पर्याय आपल्या कस्टमर साठी उपलब्ध करून देऊ शकतो.

**३ डी बनवताना आवश्यक गोष्टी :** या लेखाच्या माध्यमातून मला एक खूप महत्त्वाची गोष्ट सांगाविशी वाटते की, आपले घराचे स्वप्न पूर्ण करताना टेक्निकल लोकांना हाताशी धरूनच ते पार पाडावे. गुगलसर्च करून प्लॅन, इलेव्हेशन डाऊनलोड करून कामे परस्पर पूर्ण केली जातात. यामध्ये बिल्डींगचा प्लॅन, सभोवतालचे वातावरण राहणीमान आणि गुगल वरील सर्च केलेली ३ डी इमेज याचा कुठलाही ताळमेळ नसतो. त्यामुळे नंतर वेळ, पैसा खर्च होऊन केवळ मनःस्ताप पदरी पडतो. यामुळे योग्य तांत्रिक शिक्षण घेतलेले वास्तुविशारद यांच्याकडून आपल्या आवश्यकतेप्रमाणे प्लॅनिंग करूनच आवश्यक सर्व वर्किंग प्लॅन घेऊनच ३ डी व्ह्यू बनवावा. लेखक सचिन क्षिरसागर हे स्वतः सिव्हील इंजीनिअर असून ३ डी व्ह्यू बनविण्याच्या क्षेत्रात त्यांनी आपले करीअर केले असून मागील २५ वर्षात विविध प्रकारच्या इमारतींचे त्यांनी हजारो ३ डी व्ह्यू बनवलेले आहेत.



– इंजि. सचिन मो. क्षिरसागर
मो. नं. ९८२२०९६३९७
मेल आय डी : sakshi7889yahoo. in
ऑफिस – शॉप नं. ४, चेतना अपार्टमेंट, बडीसाजन मंगल कार्यालया शेजारी, माणिकनगर, अहिल्यानगर.

आर्किटेक्ट्स्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर
AESA
www.aesanagar.com
Reg. No. Mah/1393/1987
F 1358/1988/ANR

ज्येष्ठ नागरीक मंच व सनएज केअर कंपनीच्यावतीने

# २३ डिसेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

नगर – ज्येष्ठ नागरीक मंच, सावेडी व सनएज केअर कंपनी, सातारा, शाखा अहिल्यानगर यांच्या वतीने २३ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते सांय.६ वाजेपर्यंत ज्येष्ठ नागरीक सभागृह, गुरुकृपा कॉलनी, जैन स्थानक जवळ, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजित केले आहे. या शिबीरात गुडघे दूखी, कंबर दूखी, रक्तदाब, कॉलेस्ट्रॉल, ॲसिडीटी इत्यादी तपासणी एकाच अत्याधुनिक मशीनव्दारे तज्ञांकडून केली जाणार आहे. ज्येष्ठ नागरिक व इतर नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा. या शिबीरास कंपनीचे प्रतिनिधी ओमकार फरताडे, यास्मीन पठाण, रविंद्र घोडके हे उपस्थित राहणार आहेत. या शिबीरात आजारांवर योग्य दरात औषध उपलब्ध होतील. या शिबीराचा नागरीकांनी लाभ घ्यावा.

# नगरमध्ये २५ ते ३१ डिसेंबर दरम्यान जिल्हास्तरीय विनाशुल्क टेबल टेनिस शिबिर

नगर – किरण पवार टेबल टेनिस अकॅडमीतर्फे २५ ते ३१ डिसेंबर दरम्यान देवांग गुजराथी याच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय विनाशुल्क टेबल टेनिस शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



देवांग गुजराथी

देवांग हा एक राज्यस्तरीय टेबल टेनिस खेळाडू होता. त्याचे टेबल टेनिस खेळावरील प्रेम वाखाणण्याजोगे होते त्यामुळे त्याच्या स्मरणार्थ या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर किरण पवार टेबल टेनिस अकॅडमी, स्वामी समर्थ मंदिराजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे सायंकाळी ५.१५ ते ६.४५ या दरम्यान घेण्यात येणार आहे. या शिबिरात अहिल्यानगर शहरासह ग्रामीण भागातील चार वर्षापासून पुढील सर्व मुले– मुली तसेच महिला– पुरुष अशा सर्व वयोगटाकरिता मोफत प्रवेश आहे.

या शिबिरात टेबल टेनिसचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण त्याचबरोबर खेळाडूंचा शारीरिक व मानसिक विकास तसेच रनिंग, स्किपिंग, एक्झरसाइज, आहार, योगा व मेडिटेशन यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिरात खेळाडूंना एन. आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक, राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते तसेच क्रीडा व योगशिक्षक किरण पवार सर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या शिबिरात भाग घेण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी किरण पवार सर, मोबाईल नं. ९४२००३७७८२ यावर संपर्क करावा. जिल्ह्यातील सर्व वयोगटातील क्रीडा प्रेमींनी या शिबिरात सहभाग सहभागी व्हावे असे आवाहन राजेंद्र गुजराथी यांनी केले आहे.

# सर्वसामान्य रुग्णांपर्यंत डोळ्यांची आरोग्यसेवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करीन

## नेत्रतज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांचे प्रतिपादन, लाईव्ह सर्जरी करण्याचा सन्मान मिळाल्याबद्दल सत्कार

नगर – डोळ्याचा डॉक्टर म्हणून मी गेल्या दहा वर्षापासून काम करत असून रुग्णांच्या विश्वासाच्या जोरावर चांगले काम करायला मिळत आहे, लाईव्ह डोळ्याची सर्जरी करण्याचा मान मिळाला आहे, नगरकरांमुळे मी चांगला डॉक्टर म्हणून रुग्णांच्या उपचारासाठी चांगले काम करत आहे. राज्यभरातील मुंबई, पुणे, संभाजीनगर, नाशिक या भागातून रुग्ण नगरमध्ये येऊन आपल्या डोळ्याची सर्जरी करत आहे. मी चांगला सर्जन आहे हे रुग्णांनी सांगावे लागते तेव्हा काम करण्याची प्रेरणा व ऊर्जा मिळत असते. गरजूवंत रुग्णांसाठी लवकरच चॅरिटेबल विभाग सुरू करत असून सर्वसामान्य रुग्णांपर्यंत डोळ्यांची आरोग्यसेवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करीन. माजी महापौर बाबासाहेब वाकळे व रासनेनगर ज्येष्ठ नागरिकांनी माझ्या आरोग्य सेवेची दखल घेऊन माझा सत्कार केला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. नगरमध्ये आता आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळत असल्यामुळे रुग्णांना पुणे मुंबईला जाण्याची गरज नाही, असे प्रतिपादन नेत्रतज्ञ डॉक्टर प्रफुल्ल चौधरी यांनी केले.



नेत्रतज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नेत्रतज्ञ प्रफुल्ल चौधरी यांना लाईव्ह सर्जरी करण्याचा सन्मान मिळाल्याबद्दल माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यावतीने सत्कार झाला. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे जिल्हा अध्यक्ष सर्वोत्तम क्षीरसागर, बलभीम पांडव, कृष्णराव बागडे, ज्ञानदेव शहाणे, अशोक भालेराव, ओमप्रकाश तिवारी, मच्छिंद्र नवले, सतीश वाघमारे, अशोक जगताप, डॉ.मनोहर देशपांडे, थांगावेल स्वामी, भगवान कुलकर्णी, सचिन फाटक, प्रमोद देवधर, सुनील कुलकर्णी, उदय ठोंबरे, महादेव मानकर, उमेश कुलकर्णी, अजित वाडेकर, अमित पाटील, गितेश कुलकर्णी, राजेंद्र कांबळे, प्रक्षेप सोमवंशी, भारत सिंह, सुभाष जठार, दिलीप कटारिया, सोमनाथ खाडे, महेश शहाणे, अजित सोमवंशी, अजिंक्य वाकळे, पुष्कर कुलकर्णी, सूरज कुरलिये, गणेश बुरा, निलेश जाधव, शिवा आढाव, बापू राजळे, प्रमोद तिरोडकर, भाऊसाहेब लटके, ईश्वरलाल भोपळे, हौसही आठरे आदी उपस्थित होते.

बाबासाहेब वाकळे म्हणाले की, डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी सर्वसामान्य कुटुंबातून येऊन आरोग्य क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे, डोळ्याच्या सर्जरीमध्ये डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी आपल्या नगर शहराचे नाव राज्य देशपातळीवर घेऊन जाण्याचे काम केले आहे, आपल्या माणसाचे कौतुक आपणच करायला पाहिजे त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे गरजेचे आहे या माध्यमातून ते अजून जोमाने काम करतील व आपल्या शहरातील रुग्णांना चांगली आरोग्यसेवा देतील. ज्येष्ठ नागरिक एवढ्या मोठ्या संख्येने डॉक्टरांचा सत्कार करण्यासाठी उपस्थित राहिले त्यामुळे त्यांच्या आशीर्वादातून चांगले काम करण्याची प्रेरणा व ऊर्जा मिळत राहील असे ते म्हणाले.

### आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला!

मला भारतातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठित नेत्ररोग तज्ञांच्या समाजांपैकी एक असलेल्या बॉम्बे ऑप्थॅल्मिक असोसिएशन (BOA) येथे लाईव्ह सर्जरी करण्याचा सन्मान मिळाला. ही माझी MOSCON नंतरची दुसरी लाईव्ह सर्जरी आहे ही विलक्षण संधी मला टॉरिक ॲडव्हान्स मॉनोफोकल लेन्सेस (SWISS Phob) चा वापर करून कॉर्नियल ॲस्टिग्मॅटिझम सुधारण्याची आणि कॉर्टिकल कॅटॅरॅक्टच्या रुग्णाला उत्कृष्ट मध्यम आणि लांब अंतराच्या दृष्टिसाठी उपचार करण्याची प्रक्रिया सादर करण्याची मिळाली. हे सर्व अत्याधुनिक भारतीय फेकोइमल्सिफिकेशन सिस्टिम वापरून साकारले गेले, ज्यामुळे भारतीय नेत्र तंत्रज्ञानाची प्रगत क्षमता अधोरेखित झाली, विशेषतः अप्पासामी गॅलेक्सी लिओ फेको सिस्टिम आणि ट्रू ग्लो मायक्रोस्कोप– हे नाविन्य आणि उत्कृष्टतेचे प्रतीक आहेत. BOA टीमचे, विशेषतः पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, डॉ. रघिनी पारेख, डॉ. करीश्मा वाडिया, डॉ. सुमीत लहाने आणि रघुनाथ नेत्रालयच्या संपूर्ण टीमचे मनापासून आभार, ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि नेत्ररोगशास्त्राच्या क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी आपल्या निस्सीम समर्पणाने प्रेरणादायक वातावरण तयार केले. नेत्ररोगशास्त्रातील काही सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांच्या सहवासात राहून, रुग्णसेवा आणि नाविन्य आणण्यासाठी आमच्या सर्वांच्या सामूहिक उत्साह आणि बांधिलकीचे पुनः अवलोकन झाले. केवळ रुग्णांना उपचार देणे नाही, तर आपल्या व्यावसायिकतेच्या प्रगतीत सक्रियपणे योगदान देणे, जेणेकरून असंख्य रुग्णांसाठी उज्ज्वल आणि स्पष्ट भविष्य निर्माण होईल अशी माहिती डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी दिली



अमित शाह यांच्या वक्तव्याचा निषेध बहुजन समाजाची माफी मागण्याची मागणी करण्यात आली.

# अमित शाह यांच्या वक्तव्याचा निषेध, बहुजन समाजाची जाहीर माफी मागावी

नगर – केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संविधानावरील चर्चे दरम्यान राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावरुन केलेल्या वक्तव्याचा समाजवादी पार्टीच्या वतीने शहरात निषेध करण्यात आला. मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन शाह यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. जय भीमचा नारा देऊन, शाह यांनी समस्त बहुजन समाजाची जाहीर माफी मागण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनात शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन, आसिफ रजा, अल्ताफ लकडवाला, तन्वीर बागवान, शब्बीर खान, समीर शेख, दिलावर खान, मतीन खान, अजय भोसले, विजय गायकवाड, नितीन कसबेकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आबिद हुसेन म्हणाले की, बाबासाहेबांच्या नावाला फॅशन म्हणणाऱ्या शाह यांनी स्वतःच्या विचारांची फॅशन तपासावी. त्यांनी बहुजनांचे कैवारी असलेल्या बाबासाहेबांचा पवित्र संसदेत अवमान केला आहे. भाजपच्या सत्तेत वारंवार महापुरुषांची अवमान केला जात आहे. तर जातीय द्वेष पसरवून राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार सुरु आहे. भाजप देखील अशा गोष्टींचे समर्थन करत असल्याने वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या त्यांच्या नेत्यांवर कारवाई होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

# शासनाने ग्राम स्वच्छता अभियान राबवून संत गाडगेबाबांचे कार्य सुरू ठेवले

## आकाश दरेकर यांचे प्रतिपादन; वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी सकाळीच शहरातून स्वच्छता फेरी काढून दिला स्वच्छतेचा संदेश

नगर – शहरातील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे श्री संत गाडगे महाराज छात्रालय स्टेशन रोड अहिल्यानगर या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी श्री संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्तअहिल्यानगर शहरातून स्वच्छता फेरी काढण्यात आली. फेरीची सुरुवात राष्ट्रीय पाठशाळा हायस्कुल मधून– माळीवाडा बस स्टॅन्ड– तसेच शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून – पुणे बस स्टॅन्ड वर आली. व त्या ठिकाणी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी पुणे बस स्टॅण्ड स्वच्छ केले. या फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी गाडगे महाराजांच्या संदेशाच्या घोषणा दिल्या गाडगेबाबाचे आवडते भजन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाने परिसर दणाणून सोडला. नंतर स्वच्छता फेरी चाणक्य चौक महात्मा फुले चौक मार्गे पुन्हा वसतिगृहात आली. वसतिगृहात स्वच्छता फेरीचा समारोप झाला. या स्वच्छता फेरीच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषद माध्यमिक उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी सुरेश ढवळे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात गाडगे महाराजांच्या प्रतिमापूजनाने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसतिगृह अधिक्षक बाबासाहेब पातकळ यांनी केले.



श्री संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी शहरातून स्वच्छता फेरी काढून स्वच्छतेचा संदेश दिला.

अधीक्षक पातकळ यांनी आपल्या प्रास्तविकातुन संस्थेच्या सर्व वसतिगृहाला गाडगे बाबा यांचे नावे दिल्याचा इतिहास सांगुन कॉ.आबासाहेब काकडे यांनी गाडगे बाबांना आपले गुरु मानले होते. कॉ. आबासाहेब नंतर संस्थेचे प्रमुख ॲड. विद्याधर काकडे व माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.हर्षदाताई काकडे यांनी दिनदलित अनाथ निराधार गरीब गरजुवंताचे पालकत्त्व स्विकारुन समाज सेवेचे कार्य सुरु ठेवले आहे. याप्रसंगी वसतिगृहातील विद्यार्थी करण बारगजे, भागवत धलपे, या विद्यार्थ्यांनी गाडगे बाबांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ बोडखे यांनी गाडगेबाबांच्या जीवनाविषयी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर यांनी आपल्या भाषणात गाडगेबाबांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वच्छता अभियाना बाबत मार्गदर्शन केले. गाडगे बाबांनी स्वत: कृतीतुन स्वचतेचा संदेश दिला. महाराष्ट्र शासनाने सुद्धा गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवून गाडगेबाबांचे कार्य पुढे सुरू ठेवले. भारत सरकारने सन २०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान सुरु केले. विद्यार्थांनी खुप अभ्यास करून, क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपल्या आईवडील व शिक्षकांचे नाव उज्वल करावे असे सांगितले. गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून संस्थेचे प्रमुख ॲड. विद्याधर काकडे व हर्षदाताई काकडे यांच्या संकल्पनेतून वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना हिवाळा असल्याने खारीक–खोबरं – डिंक लाडू प्रत्येकी एक किलो प्रमाणे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन बाबासाहेब लोंढे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी संजय सकट, कविराज बोटे, तुकाराम विघ्ने, राहुल लबडे इत्यादींनी परिश्रम घेतले.



स्नेहालय संचलित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटरच्यावतीने रामवाडी येथील कचरा वेचक, कष्टकरी व कामगार वर्गातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

# झोपडपट्टीतही आरोग्याची जनजागृती होणे आवश्यक

### विकास उडानशिवे यांचे प्रतिपादन; कचरा वेचक, कष्टकरी व कामगारांची मोफत आरोग्य तपासणी

नगर – झोपडपट्टी भागात आरोग्याची जागृती होणे आवश्यक आहे. गंभीर आजार झाल्यावर नागरिक औषधोपचारासाठी धावतात. मात्र वेळेवर आजाराचे निदान झाल्यास भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. वेळोवेळी तपासणीला पैसे नसल्याने इच्छा असताना देखील आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना आरोग्याकडे लक्ष देता येत नाही. केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलने झोपडपट्टीतील नागरिकांच्या आरोग्यासाठी उचलेले पाऊल गरजूंना आधार देणारे आहे. आरोग्य सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. आरोग्य सेवेतून एखाद्याचे जीव वाचविण्याचे समाधान संस्थेला मिळणार असल्याचे विकास उडानशिवे यांनी सांगितले.

स्नेहालय संचलित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटरच्यावतीने रामवाडी येथील कचरा वेचक, कष्टकरी व कामगार वर्गातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. गणपत वसावे, समुपदेशक गौरी लोणारे, लॅब टेक्निशियन वैशाली पंडोरे, सिस्टर दिपाली भांबळ, राखी देसले, विशाल खताडे, विनायक महाले, बालभवनचे केंद्र समन्वयक सचिन वाघ, जयश्री शिंदे, आशा खाला, अनिता सामल, शमा सय्यद आदी उपस्थित होत्या.

डॉ. गणपत वसावे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करुन सदृढ आरोग्यासाठी मार्गदर्शन केले. तर या हॉस्पिटलच्या माध्यमातून गरजू घटकांना मोफत व अल्पदरात आरोग्य सुविधा दिल्या जाणार असल्याची माहिती दिली.

या शिबिरात किमान दोनशे पेक्षा जास्त नागरिकांच्या विविध प्रकारच्या तपासण्या करुन त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

# 'अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्ष'पदी राजेश कातोरे पाटील यांचा विक्रमी मतांनी विजय

### उपाध्यक्षपदी वैभव आघाव व सचिवपदी संदीप बुरके विजयी



अहमदनगर बार असोसिएशनच्या निवडणुकीत अध्यक्षपदी राजेश कातोरे, उपाध्यक्षपदी वैभव आघाव व सचिवपदी संदीप बुरके हे निवडून आले.

नगर – जिल्हा नायायालायातील अहमदनगर बार असोसिएशनच्या २०२५ वर्षासाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी राजेश कातोरे विक्रमी मतांनी विजयी झाले आहेत. तसेच उपाध्यक्षपदी वैभव आघाव व सचिवपदी संदीप बुरके हे निवडून आले आहेत. शुक्रवारी सकाळी सुरु झालेल्या मतदानाची सायंकाळी उशीराने मतमोजणी संपल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी अॅड.अरुण भालसिंग यांनी निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर केला. या निवडणुकीत १६९४ पैकी ११४७ मतदान झाले. या निवडणुकीत महिला सहसचिव, खजिनदार, महिला व पुरुष कार्यकारीणी सदस्य आदी पदांची निवडणूक याआधीच बिनविरोध झाली आहे. यावेळी वकील वर्ग उपस्थित होते.

अहमदनगर बार असोसिएशनच्या निवडणुकीच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत उमेदवार राजेश कातोरे यांना ८९९ मते मिळाली तर विरोधी उमेदवार संदीप काळे यांना अवघे २२४ मते मिळाल्याने तब्बल ६७५ मतांनी राजेश कातोरे यांनी संदीप काळेंवर विजय मिळवला. उपाध्यक्षपदाकरता झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत वैभव आघाव यांना ५८२ तर विरोधातील संदीप पाखरे यांना ५५९ मते मिळाली. वैभव आघाव यांनी केवळ २४ मतांनी संदीप पाखरेंवर मात केली. सचिव पदाकरता झालेल्या निवडणुकीत संदीप बुरके यांना ५७९ तर विरोधातील विनोद शेटे यांना ५५५ मते मिळाली संदीप बुरके यांनी विनोद शेटे यांचा २४ मतांनी पराभव केला.



राजेश कातोरे



वैभव आघाव



संदीप बुरके

अहमदनगर बार असोसिएशनचे निवडणूक निर्णय अधिकारी अरुण भालसिंग व भाऊसाहेब घुले यांनी जाहीर केलेली अंतिम कार्यकारणी मंडळ पुढीलप्रमाणे– अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके, सहसचिव मनिषा केळगंद्रे, खजिनदार अनुराधा येवले, महिला सहसचिव जया पाटोळे, कार्यकारणी सदस्य अभिजीत देशमुख, निखिल ढोले, दीपक आडोळे, विजय केदार, रामेश्वर कराळे, शिवाजी शिंदे व ज्योती हिमणे.

यावेळी नूतन अध्यक्ष राजेश कातोरे म्हणाले, वकील बंधू भगिनींनी मला मोठ्या बहुमताने मताधिक्य दिले आहे. या सर्वांच्या ऋणात राहून माझ्यावर त्यांनी जो विश्वास व्यक्त केला आहे त्यास पत्र राहून वर्षभर उत्कृष्ट काम करण्याचा माझ प्रयत्न राहील. वर्षभरात सर्व सहकारी वकील, हितचिंतक, मित्र यांना बरोबर घेत वकील संरक्षण कायदा लागू व्हावा यासाठी पाठपुराव्यास प्राधान्य देत वकिलांच्या हितासाठीच काम करणार आहे. अशी ग्वाही दिली.

निवडणुकीचा निकाल जाहीर होताच वकिलांसह सर्व विजयी व बिनविरोध निवडून आलेल्या वकिलांनी गुलालाची उधळण करीत विजयोत्सव साजरा.

# बालाजी मंदिरात अय्यप्पा स्वामींची सोमवारी शास्ता प्रीती पूजा

### पद्मनाभमन मंदिराचे पुजारी विष्णू वासुदेवेन नंबूदिरी ची उपस्थिती



नगर – सालाबादप्रमाणे 'सबरीमला अयप्पा सेवा समाजम' तर्फे २३ डिसेंबर रोजी संध्या.४:३० ते रात्री १० वाजेपर्यंत लोककल्याणार्थ श्री अयप्पा स्वामी यांची मनभावना पूजा'शास्ता प्रिती'चे आयोजन श्रमिक बालाजी मंदीर, श्रमिकनगर, अहिल्यानगर येथे करण्यात आलेले आहे.

शास्ता प्रिती ही पूजा अयप्पा भक्तांद्वारे संपूर्ण जगात या कालावधीमध्ये चार टप्प्यामध्ये केली जाते. ते चार टप्पे म्हणजे आवाहन आणि गणपती पूजा, शास्ता पूजा व शास्ता भजन, १८ महापडीपूजा व आरती आणि हरिवारसनम अष्टकम होय, या पूजेमध्ये नैतिक बाल ब्रम्हचारी अय्यप्पा स्वामींना लोक कल्याणाचं आवाहन करुन स्वामीच्या आवडीचे पूजा,भजन व अन्नदान करुन स्वामींना हरिवासनम गाऊन झोपवले जाते.

शास्ता प्रिती पूजा विश्वविख्यात श्री पद्मनाभम मंदिराचे पुजारी ब्रम्हश्री गोशाला विष्णू वासुदेवेन नंबूदिरी यांच्या हस्ते होईल व भजन कलाईमामनी विरमनी राजू आणि सहकारी सादर करतील. यावेळी डॉ.अॅड.यशोधन साखरे महाराज(साधकाश्रम, आळंदी), टी.बी. शेखर(ट्रस्टी अध्यक्ष, शबरीमला अयप्पा सेवा समाज), विश्राम भालचंद्र देव (वंशज मोरया गोसावी), भालचंद्र बडवे (अध्यक्ष–मोहिनीराज देवस्थान, नेवासा), गुरूस्वामी साहेबराव हरि पवार, (संरक्षक श्री साईबाबा मंदीर चॅरीटेबल ट्रस्ट व अखिल भारतीय अयप्पाधर्म प्रचार सभा) हे उपस्थित राहणार आहेत.

सर्वांनी सह कुटुंब उपस्थित राहुन पुजा, भजन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन सबरीमाला अयप्पा सेवा समाज,अहिल्यानगर जिल्हाचे अध्यक्ष उदयकुमार के, उपाध्यक्ष हरिचंद्रन एन नायर, जनरल सेक्रेटरी जस्ना अजित, जे.टी.सचिव अखिल कुमार एम.सी, कोषाध्यक्ष विनेश नायर, अजि क्रिशना राष्ट्रीय प्रशासन, सचिव, सबरीमाला अयप्पा सेवा समाज (SASS), भारत, विनोद म्याना अध्यक्ष, श्रमिक बालाजी देवस्थान संस्था यांनी केले आहे.

# ज्ञानसंपदा शाळेत २४ डिसेंबर रोजी ज्ञानोत्सव आनंद मेळ्याचे आयोजन

नगर – विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येणे त्यांच्या व्यवहारिक ज्ञानात वृद्धी व्हावी, दैनंदिन व्यवहारातील देवाण–घेवाण, त्यातील हिशोब समजणे व्यवसायाचे सुयोग्य नियोजन करता यावे तसेच विविध कला कौशल्याला चालना मिळावी या मुख्य उद्देशाने ज्ञानसंपदा शाळेत ज्ञानोत्सव आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेने २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत या ज्ञानोत्सवाचे आयोजन केले आहे.

या ज्ञानोत्सव आनंदमेळ्यात विविध खाद्यपदार्थांची रेलचेल असेल, त्यामध्ये चॉकलेट, मफिन्स, भेळ, पाणीपुरी, पॅटीस, वडापाव, व्हेज बिर्याणी, मंचुरियन, समोसा, आईस्क्रीम, व्हेज कटलेट, खाजा, मसाला पान, पापड भाजी, आलू चाट इत्यादी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स असणार आहेत. विविध प्रकारचे गेम्स स्टॉल्स, विविध प्रकारचे हिवाळी उबदार कपडे, सौंदर्यप्रसाधने, शालेय स्टेशनरी, विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. शाळेतर्फे तसेच विद्यार्थ्यांतर्फे सर्वांना या पर्वणीचा आनंद व आस्वाद घेण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.



२० डिसेंबर रोजी अनिल शर्मा प्रॉडक्शनच्या वनवास चित्रपटाचा प्रीमियर शो चे आयोजन पीव्हीआर सिटी मॉल अंधेरी वेस्ट येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्यावतीने ध्यानधारणा प्रशिक्षक बीके डॉ. दीपक हरके यांनी मुख्य कलाकार अभिनेता उत्कर्ष शर्मा व अभिनेत्री सिमरत कौर यांची भेट घेऊन संस्थेच्या कार्याची माहिती देऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालयाला भेटीचे निमंत्रण दिले.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २१ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# संताचे विचार मनुष्याला मार्गदर्शक : ह.भ.प.रामदास महाराज क्षीरसागर

### तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त तुकाराम गाथा पारायण सोहळ्यास प्रारंभ



तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याचे संत श्री संताजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करुण उद्घाटन करण्यात आले.

नगर – तिळवण तेली ट्रस्टच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून विविध उपक्रमातून समाजोन्नत्तीचे चांगले काम सुरु आहे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमातून समाजाला एकत्रित करुन त्यांच्या उन्नत्तीसाठी जे उमक्रम राबविले जात असल्याने त्यातून त्यांची प्रगती साधली जात आहे. त्याचबरोबर संत जगनाडे महाराज यांची जयंती– पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात येत असलेल्या सप्ताहामुळे संत जगनाडे महाराजांचे विचार कृतीतून अंमलात आणीत आहेत. आपल्या संतांनी जी शिकवण दिली, त्याचे अनुकरण करुन आपण आपले जीवन समृद्ध केले पाहिजे. समाजाला जोडणारे असे उपक्रम कौतुकास्पद असेच आहे, असे प्रतिपादन ह.भ.प.रामदास महाराज क्षिरसागर यांनी केले.

संताजी भवन श्री विठ्ठल–रुख्मिणी मंदिर, तेली पंचाचा वाडा, डाळ मंडई, अहिल्यानगर येथे तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याचे संत श्री संताजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करुण उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी हभप रामदास महाराज क्षीरसागर, ट्रस्टचे विश्वस्त प्रसाद शिंदे, ज्येष्ठ नागरिक बाबुराव लोखंडे, वसंतराव काळे, सुरेश देवकर, कृष्णकांत साळुंके, भगवान नागले आदींसह अध्यक्षा निता लोखंडे, उपाध्यक्षा शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, प्रकाश सेंदर, सागर काळे, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षिरसागर, गोकुळ कोटकर आदिंसह महिला उपस्थित होत्या.

पुढे बोलताना हभप रामदास क्षीरसागर म्हणाले, संतांचे विचार हे चिरकाल मनुष्याला मार्गदर्शक आहेत. त्यामुळे या विचारांचा स्विकार करुन जीवनात त्याचा अंगिकार केला पाहिजे. संत जगनाडे महाराजांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाथांचे पुर्नजिवित करुन लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. तोच वारसा आपणही पुढे चालविला पाहिजे, असे सांगितले.

अध्यक्षा निता लोखंडे म्हणाल्या कि तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही सात दिवसीय तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत सकाळी गाथा पारायण, सायंकाळी सरस्वती महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल. २८ डिसेंबर रोजी हभप रामदास महाराज क्षीरसागर यांचे गुलालाचे किर्तन होईल. त्यानंतर मिरवणुक होईल, मिरवणुकीनंतर संताजी महाराज यांच्या मुर्तीची पूजा व आरती होऊन पुष्पवृष्टी करण्यात येईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास कृष्णाबाई सेंदर, कमलबाई नागले, आशा वाल्हेकर, चंदा म्हस्के, अलका म्हस्के, सुरेखा सेंदर, विमल वराडे, वृषाली अडगटला, निशा तरटे, गोदाबाई दिवटे, पुष्पा घोडके, अहिल्या कोदे, सत्यभामा शेरकर, पदमा पाथरकर, स्वाती शेंडगे, लीलाबाई शिंदे, आसराबाई सोनवणे, पुष्पा रासकर, शशिकला काशिद, गोयल, रत्नमाला गुरसाळे आदी महिला उपस्थित होत्या. आदिंसह उत्सव समितीचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# कापड बाजार भागातील जागा कोणताही मोबदला न घेता गुजराथी परिवाराकडून झालानी परिवारास भेट

### दोन्ही परिवाराने ७४ वर्षापासून जपला ऋणानुबंध, अनोखा कृतज्ञता सोहळा



कापड बाजार भागातील जागा कोणताही मोबदला न घेता गुजराथी परिवाराने झालानी परिवारास भेट दिली. यावेळी दोन्ही परिवारातील उपस्थित सदस्य.

नगर – शहरातील कापड बाजार म्हणजे अगदी मोक्याची जागा आणि हीच जागा कोणताही मोबदला न घेता गुजराती परिवाराकडून झालानी परिवारास परत देण्यात आली. शहरातून या दोन्ही परिवारांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ज्या दुकानापासून आपली व्यवसायाची सुरुवात झाली आणि भरभराट झाली ते दुकान कोणत्याही मोबदल्याशिवाय परत द्यायचे असा सर्वानुमते निर्णय गुजराथी परिवाराने घेतला. दत्त जयंतीचा मुहूर्त साधून झालानी परिवारातील सुधीर, डॉ.कैलास, दीपक, जगदीश, राजेश, रोहित, अक्षत, सौरभ, डॉ.अश्विन, निखिल, नमन, निहार आणि सलोनी या सर्वांना बोलावून यथोचित सत्कार केला आणि झालानी परिवाराचे आभार मानले.

साधारणपणे १९५० चा काळ असेल. झालानी परिवारातील श्रीनारायण झालानी आणि दामोदर झालानी यांनी शहरातीलच गोपाळदास गुजराथी आणि बाबुभाई गुजराथी यांना कापड बाजारातील दुकानाची जागा व्यवसायासाठी दिली. त्या ठिकाणी त्यांनी हार्डवेअर मशीनरीचे सामान सदर दुकानात विक्रीसाठी ठेवले. पुढच्या पिढीतील राधेश्याम, रामधन व रूपनारायण झालानी यांच्याबरोबर गुजराथी परिवाराचे अगदी घरोब्याचे संबंध वाढत गेले. गोपाळभाईंच्या पुढील पिढीमधील राजेंद्र व महेंद्र गुजराथी व बंधू नंदकुमार व श्रीकांत यांनी दोन्ही परिवारातील स्नेह पुढे जोपासला. गोपाळभाईंचा हा व्यवसाय नंतरच्या पिढीने तसाच सुरू ठेवून वटवृक्षासारखा बहरत व पुढे नेला आणि एमआयडीसी परिसरात हाच व्यवसाय सुरू करून यशस्वीरित्या वाढवला. आपला हा व्यवसाय स्थिरावला असल्याने आपण कापड बाजारातील दुकानाची जागा झालानी परिवाराला परत द्यावी असा मनोदय स्व. गोपाळभाईंनी आपल्या परिवारातील नंदु, स्व.महेंद्र, देवेंद्र, आदित्य व पलाश गुजराथी आणि इतर सदस्यांसमोर व्यक्त केला. परिवारातील सर्व सदस्यांनीही त्यांस आनंदाने मान्यता दिली.

### गुजराथी व झालानी परिवाराकडून सामाजिक बांधिलकीचे दर्शन

असं म्हणतात, कृतज्ञता ही जो व्यक्त करतो. त्याला आणि ज्याच्याबद्दल व्यक्त केली जाते त्याला असे दोघांचेही जीवन सुंदर बनवते. अशीच कृतज्ञता व्यक्त केली जात आहे. अहिल्यानगर शहरातील बंबईवाला मिठाईचे संचालक आणि सर्व झालानी परिवार व गुजराथी परीवार यांनी ७४ वर्षापासूनचा ऋणानुबंध जपला आहे.

# संतोष देशमुख यांच्या हत्येमधील आरोपींना कठोर शिक्षा करावी

### संपुर्णा सावंत यांची मागणी



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमधील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीचे निवेदन जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने देण्यात आले.

नगर – मस्साजोग केज बिड येथील सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेचा जिजाऊ ब्रिगेड अहिल्यानगरकडून जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष शीवमती संपूर्णा सावंत, उपाध्यक्ष शोभा भालसिंग, तालुका अध्यक्ष सुरेखाताई कडूस, सचिव वंदना नीगुट, शिलाताई शिंदे, अंमल सासे, सुरेखा सांगळे, स्वाती शेटे पाटील, राजेश्री वणी आदी उपस्थित होते.

सदरील हत्या ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या हत्येमागे एक मोठी बलाढ्य शक्ती आहे. ज्यामुळे समाजातील निरपराध लोकांचा बळी जात आहे. या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाही तर समाजाचा पोलीस यंत्रणेवरील व न्यायपालिकेवरचा विश्वास संपून जाईल, असे जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष शीवमती संपूर्णा सावंत यांनी सांगितले.

या प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड यांच्यावतीने तहसीलदारांमार्फत निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्याकडे करण्यात आली आहे.

# निरामय


## हिवाळ्यात हृदयविकाराला निमंत्रण

हिवाळा ऋतू तसा आल्हाददायक आहे; पण हवामानात बदल झाला की, अनेक आजार डोके वर काढू लागतात. सध्या अशा वातावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते. आता हृदयविकाराच्या रुग्णांना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. कारण हिवाळ्यामध्ये हृदयविकाराच्या घटनांमध्ये सर्वाधिक वाढ होताना दिसते. या दिवसांमध्ये हवामानातील तापमान घटते. कमी तापमानामुळे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्या आकुंचन पावतात. यामुळे रक्त हळूहळू हृदयापर्यंत पोहोचते. रक्तपुरवठा मंदावतो, तेव्हा रक्तवाहिन्यांमध्ये गुठळ्या तयार होतात. अशा स्थितीत रक्तपुरवठा खंडित होऊन हार्ट अटॅक येतो. थंड वातावरणामुळे शरीरातील उष्णता टिकवून ठेवणे कठीण होते. अशा परिस्थितीमध्ये हायपोथर्मिया होऊ शकतो. ज्यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. परिणामी हृदयविकाराच्या झटका येण्याची संभावना असते. बाहेरचे तापमान थंड असेल तर शरीराची मज्जासंस्था सक्रिय होते. ज्यामुळे रक्तवाहिन्या अरुंद होतात ज्याला 'व्हॅसोकॉन्स्ट्रक्शन' म्हणतात. रक्तदाब अचानक वाढतो आणि शरीरात असलेल्या इतर अवयवांना रक्त पंप करण्यासाठी हृदयाला अधिक मेहनत करावी लागते आणि हृदयविकाराचा झटका येतो. हवामानासाठी अनुकूल कपडे परिधान करा. असे केल्याने उबदार राहण्यास आणि हिवाळ्यात हृदय सुरक्षित ठेवण्यास मदत होईल. टोपी, हातमोजे आणि स्वेटर घाला. रोजच्या शारीरिक हालचालींमुळे प्रतिकारशक्ती वाढते. शरीरातील उष्णता नियंत्रित करण्यास आणि तंदुरुस्त राहण्यास मदत करते. डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच व्यायाम करा. रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवल्याने हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो. ताजी फळे, भाज्या, कडधान्ये, शेंगा, संपूर्ण धान्य, बेरी, शेंगा, फ्लॅक्ससीड्स, पालक, गाजर आणि ब्रोकोली खा. गरम सूप प्या. जंक, मसालेदार, तेलकट आणि हवाबंद डब्यातील अन्नपदार्थ टाळा.



काळजी घ्या

## यकृताच्या कर्करोगाचा धोका अधिक




यकृत हा आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग आहे. यकृतामध्ये कोणत्याही प्रकारची समस्या असल्यास संपूर्ण शरीरात समस्या निर्माण होतात. यकृताशी संबंधित अनेक आजार आहेत; पण यकृताचा कर्करोग हा सर्वात गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. यकृताचा कर्करोग म्हणजे यकृतातील पेशींची अनियंत्रित वाढ. एवढेच नाही तर यकृतामध्ये कर्करोग झाल्यास तो शरीराच्या इतर भागातही पसरतो. यकृताचा कर्करोग यकृताच्या पेशींमध्ये सुरू होतो. यकृत हा एक फुटबॉलच्या आकाराचा अवयव आहे, जो पोटाच्या वरच्या उजव्या भागात असतो. यकृतामध्ये अनेक प्रकारचे कर्करोग होऊ शकतात. यकृताच्या कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार म्हणजे 'हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमा.' यकृत पेशींच्या मुख्य प्रकारात (हेपॅटोसाइट) सुरू होते. इतर प्रकारचे यकृत कर्करोग, जसे की इंट्राहेपॅटिक कोलांजिओकार्सिनोमा आणि हेपॅटोब्लास्टोमा, खूपच कमी सामान्य आहेत. यकृताच्या पेशींमध्ये सुरू होणाऱ्या कर्करोगापेक्षा यकृतामध्ये पसरणारा कर्करोग अधिक सामान्य आहे. यकृताचा कर्करोग शरीराच्या इतर कोणत्याही अवयवामध्येदेखील होऊ शकतो, जसे की कोलन, फुफ्फुस किंवा स्तन आणि नंतर यकृतामध्ये पसरतो. त्याला यकृताच्या कर्करोगाऐवजी मेटास्टॅटिक कर्करोग म्हणतात. या प्रकारच्या कर्करोगाचे नाव ज्या अवयवातून सुरू झाले त्या अवयवावरून देण्यात आले आहे. मेटास्टॅटिक कोलन कर्करोग, जो कोलनमध्ये सुरू होतो आणि यकृतामध्ये पसरतो. बहुतेक लोक प्राथमिक यकृत कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे दर्शवत नाहीत. प्रयत्न न करता वजन कमी होणे, भूक न लागणे, वेदना मळमळ आणि उलट्या, सामान्य अशक्तपणा आणि थकवा पोटात सूज येणे, त्वचा आणि डोळ्यांचे पांढरे पिवळे पडणे ही त्याची लक्षणे आहेत.

आरोग्य चर्चा

## आरोग्यदायी पंचकर्म

आयुर्वेद उपचारांचा महत्त्वाचा भाग म्हणून पंचकर्मांकडे पाहिलं जातं. खरं पाहता आयुर्वेदाचा प्रथम भर निरोगी असण्यावर आहे. पण तुमच्या प्रकृतीत बिघाड असेल तर तो बरा करण्यासाठी पंचकर्माची मदत घेतली जाते. तुमच्या आसपासचे वातावरण तुमच्यावर प्रभाव टाकत असतं. वातावरणाचा नकारात्मक प्रभाव टाळण्यासाठी पंचकर्म घेणं आवश्यक आहे. पंचकर्म उपचार पद्धती प्रतिबंध उपचार पद्धती किंवा आरोग्यास प्रोत्साहन देणारी उपचार पद्धती म्हणूनही केली जाते. शरीरातील दोषांवर उपचार करून बाहेर टाकले जातात. त्यानंतर शरीर आरोग्यपूर्ण रहावं यासाठीचे प्रयत्न पंचकर्मामध्ये केले जातात. पाच कर्मांच्या सहायाने केली जाणारी कृती म्हणजे पंचकर्म होय. जुनाट विकारांवर पंचकर्म उपचार लाभदायी ठरतात. पाच उपचार पद्धतींचा मेळ पंचकर्मात घातला जातो. वमन, विरेचन, बस्ती, नस्य, रक्त मोक्षन अशा पाच क्रिया पंचकर्मात समाविष्ट असतात. जाणून घेऊ त्या विषयी...



✽ वमन – यामध्ये वांती म्हणजेच उलटीच्या सहायाने शरीरातील रोग बाहेर टाकला जातो. शरीरातील कफ दोष वाढला असता, वमन उपचार पद्धती अवलंबली जाते. यामध्ये औषधांच्या सहायाने नियंत्रित उलट्या(ओकाऱ्या) निर्माण केल्या जातात. रुग्णाला उलट्या व्हाव्यात यासाठी औषधं दिली जातात. उलट्यांद्वारे शरीरातील अतीरिक्त कफ दोष किंवा पित्त दोष निवारण्यासाठी मदत केली जाते. वमन हे लहान मुलं आणि गरोदर स्त्रियांना देऊ नये.

✽ विरेचन – या प्रक्रियेमध्ये रेचकाचा वापर करून दोष शौचावटे शरीराच्या बाहेर टाकण्यास मदत केली जाते. काविळ, जंत, कृमी यामध्ये ही पद्धत वापरली जाते. विरेचन डॉक्टरांच्या देखरेखीखाली द्यावं.


✽ बस्ती – यात वापरली जाणारी औषधे काढा, शुद्ध तेलं, दुध अशा प्रकारची असू शकतात. मणक्याची जुनी दुखणी, संधिवात, पाठदुखी अशा विकारांमध्ये बस्ती या पंचकर्म पद्धतीचा वापर केला जातो. लहान मुलं आणि गरोदर स्त्रियांना बस्ती देऊ नये. हे उपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली घ्यावेत.

✽ नस्य – या प्रकारामध्ये नाकावाटे औषधं दिली जातात. औषधी चूर्ण, काढा किंवा तेलाचे थेंब हे नाकपुडीतून दिले जातात. त्यामुळे डोकं व मानेच्या वरच्या भागात असाणारे दोष दूर केले जातात. मायग्रेन, अपस्मार, सायनस अशा विकारांमध्ये नस्य प्रभावी उपचार पद्धती आहे.

✽ रक्त मोक्षता – या पद्धतीचे दोन मुख्य प्रकार आहेत. शीर कापून किंवा जळू लावून. त्वचेचे आजार, रक्त दोष, हत्ती रोग यामध्ये रक्त मोक्षता पद्धतीचा वापर करून उपचार केले जातात.

प्रासंगिक

## नखांवरून ओळखा विकार




*शरीर अंतर्गत घडामोडींबाबत अनेकदा आपल्याला संदेश देत असतं. पण आपल्याकडून त्याकडे दुर्लक्ष केलं जातं. त्याचे परिणाम बाह्य अवयवांवर दिसून येतात. या बदलांचा परिणाम नखांवर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे नखांचा रंग बदलतो किंवा ती लवकर तुटू लागतात. बरेचदा बोटांना सूजही येते. नखांवरील परिणामांवरून व्याधीची कल्पना येऊ शकते. त्या विषयी जाणून घेऊ...*

बोटांच्या त्वचेवरील संरक्षक आवरण म्हणजे नखं. नखं वेळच्यावेळी कापणं हे आरोग्याच्या दृष्टीने चांगलं असतं असं नेहमी म्हटलं जातं. पण या नखांच्या ठेवणीवरून व्यक्तीच्या आरोग्याविषयी अनुमानही लावता येतं. नखांलगतचा भाग निळा पडणं हे रक्ताभिसरण नीट होत नसल्याचं लक्षण असू शकतं. ही स्थिती फार धोकादायक नसली तरी हातापायांची बोटं लाल, निळी किंवा पांढरी दिसू लागतात. यासोबत वेदना, बधीरता, मुंग्या येण्यासारख्या समस्या उद्भवतात. या लक्षणांसोबत ताप आल्यास न्यूमोनिया असण्याची शक्यता असते. ✽ तळहातांना घाम येणं हे ताणाचं लक्षण असू शकतं. तसंच जास्त कार्यरत असणाऱ्या थायरॉइडमुळेही ही समस्या निर्माण होते. अशा थायरॉइडमुळे चयापचय क्रिया वाढते. यामुळे आपण जास्त कॅलरी खर्च करतो आणि तळव्यांना घाम येतो. ही सततची समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. ✽ नखांवर असलेल्या उभ्या रेषा म्हणजे कॅन्सरसारख्या दुर्धर आजारपणातून नुकतंच उठल्याचं लक्षण असू शकतं. खूप आजारी असल्यावर नखांची वाढ होत नाही आणि ही समस्या निर्माण होते. ✽ निरोगी व्यक्तीच्या नखांचा रंग सर्वसाधारणपणे पांढरट गुलाबी असतो. नखं दाबली तर पांढरी दिसू लागतात आणि दाब सोडल्यावर ती पुन्हा गुलाबी होतात. पण बराच काळपर्यंत नखं पांढरीच राहिली तर शरीरात लोहाची कमतरता असल्याचं समजावं. ✽ कॅफिनचं अतिरिक्त प्रमाण, ताण-तणाव, अस्थमा आणि नैराश्यावरची औषधं यामुळे हात थरथरू लागतात. हे थरथरणं तात्पुरत्या स्वरूपाचं असतं. पण हाच प्रकार वारंवार होत असेल तर मेंदूशी संबंधित विकार असण्याची शक्यता असते. हे पार्किंसन्स या विकाराचं लक्षणही असू शकतं. ✽ तुमची बोटं सुजली असतील तर आहारात मीठाचं प्रमाण जास्त आहे हे लक्षात घ्यावं. यासोबत थायरॉइड सारख्या समस्येमुळेही बोटं सुजू शकतात. तसंच तुम्हाला डिहायड्रेशनची समस्याही असू शकते.

हेल्दी लाईफ

## पार्किन्सन्सविषयी...

शारीरिक हालचालींना प्रभावित करणारा विकार म्हणजे पार्किन्सन्स. मेंदूच्या पेशींमुळे डोपामिन या रसायनाची कमतरता निर्माण झाली तर व्यक्ती पार्किन्सन्स या विकाराला बळी पडते. या विकाराची नोंद जेम्स पार्किन्सन्स या शास्त्रज्ञाने पहिल्यांदा केली. म्हणून या विकाराला पार्किन्सन्स याचं नाव देण्यात आलं. अवयवांना असणारा कंप, ताठरलेले स्नायू, मंदावलेल्या हालचाली, सतत तोल जाणं ही या आजारपणाची लक्षणं आहेत. याखेरीज लाळ सुटणं, स्नायुदुखी, आवाज बारीक होणं ही लक्षणंही दिसून येतात. या विकारामध्ये रुग्णाची प्रतिकारशक्ती कमी होत असल्याने इतर रोगाचा संसर्ग होण्याची शक्यता मोठ्याप्रमाणावर असते. असम असलं तरी हा आजार अनुवांशिक असतो, याबद्दल कोणताही ठोस पुरावा नाही. पार्किन्सन्सच्या सर्वच टप्प्यांमध्ये व्यक्तीला अपंगत्व येतंच असं नाही. या विकाराच्या पहिल्या टप्प्यामध्ये व्यक्ती संपूर्णपणे कुणावरही अवलंबून नसते. पण पार्किन्सन्समुळे होणारे त्रास आपलं स्वरूप प्रकट करू लागले असतात. अनेकदा वैयक्तिक कामं स्वत: केली जातात. पण बाहेरच्या कामांसाठी कुणाची तरी सोबत हवीशी वाटते. एकटं जाण्याचा आत्मविश्वास नाहीसा होत जातो. अनेकदा रुग्ण पूर्णतया कोणावर तरी अवलंबून राहू लागतो. अंथरुणाबाहेर हालचाल करणं नकोसं वाटू लागतं. या विकारावर मात करण्यासाठी तीव्र इच्छाशक्तीची आणि नातेवाईकांच्या पाठबळाची गरज असते.



व्याधीविचार

## सकाळचा नाश्ता टाळला जातोय?

*सकाळी योग्य प्रमाणात नाश्ता करणाऱ्या व्यक्तींचं आरोग्य चांगलं राहतं असं एका संशोधनांमधून सिद्ध झालं आहे. सकाळचा नाश्ता करताना आहारात आरोग्यदायी पदार्थांचा समावेश असावा. दोन जेवणांच्या दरम्यान आठ ते दहा तासांचं अंतर असणं आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असतं. याविषयी अधिक जाणून घेऊ...*

आजकालची तरुणाई सतत घाईत असते. त्यामुळे योग्य आणि समतोल आहार त्यांच्या पोटात जातोच असं नाही. त्यातही सकाळचा नाश्ता अनेकदा त्यांच्याकडून केला जात नाही. मात्र, सकाळच्या वेळी उपाशी राहिल्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. जाणून घेऊ त्याविषयी...

✽ सकाळचा नाश्ता सतत टाळत राहणाऱ्या युवांना टाईप टू डायबेटिसचा त्रास होण्याची शक्यता असते.

✽ खेळ किंवा इतर शारीरिक उपक्रमांमध्ये भाग घेणाऱ्या युवकांनी सकाळचा नाश्ता टाळणं हानीकारक ठरू शकतं.

✽ सकाळच्या नाश्त्यामुळे शरीरात ग्लुकोज साठवलं जातं. त्यामुळे स्मरणशक्ती उत्तम राहण्यास मदत होते.

✽ नियमित नाश्ता न करणाऱ्या युवांमध्ये ब्लड प्रेशर लो व्हायची शक्यता असते. यामुळे चक्कर येणं, छातीत धडधडणं असे त्रास होऊ शकतात.



✽ नाश्ता टाळणाऱ्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. परिणामी आजारांचा संसर्ग कमी वेळात होतो.

✽ सकाळच्या नाश्त्यामध्ये हाय फायबर आणि लो कार्बोहायड्रेड असलेल्या पदार्थांचं सेवन केल्यास दिवसभर अॅक्टीव्ह राहण्यास मदत होते.

रहा फिट

## आहारात जायफळ हवंच!

*मसाल्यांच्या पदार्थांमध्ये जायफळाचं विशेष स्थान आहे. पदार्थांना चव आणि रंग देण्याचं काम जायफळ करतं. मिष्ठान्नांमध्ये जायफळाचा वापर आवर्जुन केला जातो. पण या व्यतिरिक्त जायफळ अनेक गुणांनी समृद्ध आहे. जायफळ आपल्याठायी उच्च पोषणमूल्यं बाळगून असतं. अशा जायफळाच्या औषधी गुणधर्मांबद्दल जाणून घेऊ.*

जायफळाच्या वापरामुळे पदार्थात चव आणि सुगंध असे दोन्ही हेतू साध्य होतात. जायफळाच्या झाडापासून दोन मसाले मिळतात. जायफळ आणि जायपत्री. पदार्थाची चव वाढवण्यासाठी जायफळाचा वापर तर पदार्थाला केशरासारखा रंग यावा यासाठी जायपत्री वापरली जाते.




✽ ग्रीक आणि रोमन संस्कृतीत जायफळाचा वापर आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी आणि शारीरिक स्वाथ्य राखण्यासाठी केला जात असे. ✽ थंडीत छातीत कफ जमा होतो. जायफळामुळे ही समस्या दूर होते. यामुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित संस्था उत्तेजित होऊन योग्य पद्धतीने कार्यरत राहते. शरीरातून विषारी घटक काढून टाकण्याच्या प्रक्रियेत जायफळाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. जायफळ हे मेंदूचं खाद्य मानलं जातं. ✽ गरोदर महिलांनी ओटीपोटालगत जायफळ तेलाने मालिश केल्यास बाळाला जन्म देण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभतेने पार पडते. ✽ जायफळाची पूड पाणी किंवा मधात मिसळून चेहऱ्याला लावल्यास त्वचा तजेलदार बनते. जायफळात जंतूनाशक गुणधर्म असल्याने त्वचेचं आरोग्य सुधारण्यास मदत होते. मुरमं, पुटकुळ्या, डाग यावर जायफळाची पूड गुणकारी ठरते. ✽ बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मामुळे जायफळाच्या तेलाचा वापर अनेक टूथपेस्टमध्ये केला जातो. अँटिसेप्टीक असल्यानं दातदुखी तसंच हिरड्यांशी संबंधित तक्रारींवर हे लाभदायक ठरतं. ✽ ओटीपोटातील वेदनांवर जायफळ गुणकारी ठरतं. मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या वेदनांवर उपचार म्हणून याचा वापर केला जातो. सांधेदुखी, स्नायू दुखण्यावर याचं तेल प्रभावी ठरतं. ✽ पचनसंस्थेशी संबंधित विकारांवर जायफळ गुणकारी ठरतं. जायफळामुळे किडनी आणि यकृतातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि त्यांचं कार्य सुधारतं.

आरोग्यदायी

## इतर कारणांमुळेही छातीत वेदना

छातीत दुखणे हे हृदयाशी संबंधित आजारांचे कारण असू शकते; परंतु काही वेळा इतर आजारांमुळेदेखील छातीत दुखू शकते. छातीत दुखत असेल तर सर्व प्रथम ईसीजी चाचणी केली जाते. त्यामुळे निदान करता येते; पण छातीत दुखत असेल, तर हृदयविकाराचा झटका येणारच असे अजिबात नाही. दीर्घकाळ छातीत दुखत असेल त्यांना इतर काही आजार असू शकतात. छातीत बराच काळ दुखत असेल आणि 'ईसीजी' चाचणी देखील नॉर्मल आली असेल, तर समजून घ्या, की हे गंभीर दुखणे नाही.

छातीत दुखणे हे केवळ हृदयाशी संबंधित गंभीर आजारामुळेच होत नाही, तर ते 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' रोगामुळेदेखील होऊ शकते. 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' हा छातीच्या हाडांशी संबंधित एक गंभीर आजार आहे. यामध्ये हाडांमध्ये वेदना होऊ लागतात. ज्यामध्ये बरगड्या आणि स्तनाचे हाड एकमेकांशी जोडलेले असतात. 'कॉस्टोकॉन्ड्रिटिस' हा एक गंभीर आजार आहे आणि त्यामुळे होणारी वेदनादेखील खूप तीव्र असू शकते. न्यूमोनिया झाल्यास छातीत दुखण्याची समस्या असते. न्यूमोनियामुळे फुफ्फुसात हवेचा पुरवठा जास्त होतो आणि खोकल्याबरोबर छातीत दुखते. मुलांमध्ये न्यूमोनियाची सर्वाधिक प्रकरणे आढळतात.



'कोस्टोकॉन्ड्रिटिस' नावाच्या आजारात बरगडीची हाडे फुगतात आणि तीव्र वेदना होतात. अशा स्थितीत या दुखण्याला हृदयविकाराचा झटका किंवा गॅस असे समजू नये. छातीत दुखणे हे एनजाइनाचे लक्षण असू शकते. हा आजार होतो, तेव्हा हृदयातील रक्ताचा प्रभाव कमी होतो. यामुळे छातीत दुखण्याची समस्या उद्भवू शकते. वैद्यकीय भाषेत याला इस्केमिक छातीत दुखणे असेही म्हणतात.

पॅनिक अटॅकमुळे छातीत दुखू शकते. या समस्येमध्ये श्वास घेण्यास त्रास होतो, कधीही पॅनिक अटॅक येऊ शकतो. हे खूपच धोकादायक आहे. कधीकधी छातीत दुखणे अॅसिड रिफ्लक्समुळे होते. आम्ल शरीराच्या अन्ननलिकेमध्ये प्रवेश करते. या प्रकारच्या समस्येमुळे पोटदुखीदेखील होऊ शकते.

निदान

## मधुमेहींसाठी हिवाळा त्रासदायक

सध्या हिवाळा सुरू आहे. ऋतू बदलला की वातावरणही बदलते. त्यामुळे विविध आजार डोके वर काढतात. त्याचा सामना लोकांना करावा लागतो. मधुमेहींनी या काळात जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. सध्या जगात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. मधुमेहाच्या रुग्णांना हिवाळ्यात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. मधुमेहींच्या रक्तातील साखरेच्या पातळीत चढउतार पाहू शकता. त्याची अनेक कारणे असू शकतात. काही गोष्टींची काळजी घेतल्यास मधुमेही रुग्ण हिवाळ्यातही रक्तातील साखरेची पातळी सामान्य ठेवू शकतात. हिवाळयात, जवळजवळ प्रत्येकाला आळसपणा येतो आणि या दिवसात लोकांना अधिक विश्रांती घेणे आवडते. तापमान घसरल्याने आळस वाढतो आणि त्यामुळे शारीरिक हालचालीही कमी होऊ लागतात. अशा परिस्थितीत, कमी शारीरिक हालचाली आणि जास्त खाणे ही साखरेची पातळी वाढवण्यास कारणीभूत आहे. यासोबतच वाढत्या थंडीमुळे शरीरातील ग्लुकोजच्या पातळीवर परिणाम होतो. साखरेची पातळी वाढण्याचे कारण म्हणजे ऑक्सिजनची कमतरता आणि रक्तवाहिन्यांचे चुकीची रिडींग असू शकते. हिवाळ्यातील जीवनशैलीत कमी शारीरिक हालचालींचा समावेश आहे आणि जास्त कॅलरी वापरल्याने साखरेची पातळी वाढू शकते. हिवाळ्यात मधुमेहींमध्ये रक्तातील साखरेची पातळी असामान्य होते. हे तेव्हाच घडते जेव्हा शरीरात इन्सुलिन योग्य प्रकारे तयार होत नाही किंवा शरीरातील पेशी इन्सुलिनसाठी योग्य प्रकारे काम करत नाहीत. हिवाळ्यात अन्न अधिक चांगले मानले जाते, कारण आजकाल बाजारात अनेक हिरव्या भाज्या उपलब्ध आहेत. म्हणूनच काही लोक काहीही विचार न करता खातात; पण असे करणे शुगर लेव्हलसाठी धोकादायक ठरू शकते. हिवाळ्यात मधुमेही रुग्णांनी आपला आहार मर्यादित आणि आरोग्यदायी ठेवावा. हिवाळ्यात तापमानात घट झाल्यामुळे शरीराचे तापमानही कमी होऊ लागते. त्यामुळे इन्सुलिनची पातळी बिघडू शकते. त्यामुळे आवश्यक असल्यास, बाहेर जा. विनाकारण घराबाहेर पडू नये आणि बाहेर जात असाल तर स्वतःला चांगले झाकून घ्या. तणाव कमी करण्यासाठी प्राणायामची मदत घ्या. स्वतःला एकटे ठेवल्याने नैराश्य येण्याचा धोका वाढतो. कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा.





जीवनशैली

# अहिल्यानगर महानगरपालिका आयोजित गणेशोत्सव देखावे स्पर्धेचा निकाल जाहीर

## २४ डिसेंबर रोजी राजमाता जिजाऊ सभागृहात विजेत्या गणेश मंडळांना पारितोषिक होणार वितरण; कार्यक्रमांचे आयोजन

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकामार्फत घेण्यात आलेल्या गणेशोत्सव देखावे स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण २४ डिसेंबर रोजी आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते व आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील राजमाता जिजाऊ सभागृह येथे दुपारी ४ वाजता पारितोषिक वितरण सोहळा होणार आहे. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, संतोष टेंगले, प्रियंका शिंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, सहाय्यक संचालक नगररचना स्नेहल यादव, जल अभियंता परिमल निकम, सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, मेहेर लहारे, सपना वसावा, निखील फराटे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, शहर अभियंता मनोज पारखे आदींसह परीक्षण समिती अध्यक्ष तथा उपायुक्त प्रियंका प्रकाश शिंदे, प्रसिध्दी व सांस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा विभाग प्रमुख व्हिन्सेंट फिलीप्स, अमोल खोले, स्वप्नील मुनोत, अमोल बास्कर, अशोक डोळसे, मयूर मेहता, सर्व प्रभाग अधिकारी, प्रशासनधिकारी शिक्षण विभाग, सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. या पारितोषिक वितरण सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व सांस्कृतिक विभागाने केले आहे.

**गणेशोत्सव देखावे स्पर्धेचा निकाल २०२४ :** समाज प्रबोधनपर देखावे, स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलन, पाणी बचत आदी व इतर समाज प्रबोधनपर देखावे, व्यसनमुक्तीपर देखावे, प्लॅस्टिक मुक्ती, बेटी बचाव बेटी पढाओ, जागतिक महामारीवर देखावे : प्रथम क्रमांक – तेलिखुंट तरुण मंडळ (नारी साक्षात अंबिकेचे रूप), द्वितीय क्रमांक (विभागून) – नवग्रह मित्र मंडळ (प्लास्टिकचा भस्मासूर) व छत्रपती शिवाजी आखाडा तरुण मंडळ (वासुदेवाची स्वारी), तृतीय क्रमांक (विभागून) – चौपाटी कारंजा मित्र मंडळ (संस्कार ही अपराध रोख सकता है.. सरकार नाही) व शिवगर्जना मित्र मंडळ (रोबोट).

**ऐतिहासिक देखावे :** प्रथम क्रमांक – शिववरद प्रतिष्ठान (पावन खिंड), द्वितीय क्रमांक (विभागून) – डाळमंडई तरुण मंडळ (शिवरायांचे गोरक्षण) व जनजागृती मित्र मंडळ (भक्ती शक्ती), तृतीय क्रमांक – जय आनंद महावीर युवक मंडळ (शिवराज्य अभिषेक सोहळा).

**धार्मिक व अध्यात्मिक देखावे :** प्रथम क्रमांक – नेताजी सुभाष तरुण मंडळ (द्रोणागीरी पर्वत – संजीवनी बुटी), द्वितीय क्रमांक (विभागून) – श्री महावीर प्रतिष्ठान (मार्कंडेय मुनींची कथा) व राजयोग प्रतिष्ठान (योग योगेश्वर शंकर महाराज), तृतीय क्रमांक (विभागून) – आदर्श युवक मंडळ (चांगदेव महाराजांचे गर्वहरण) व नंदनवन मित्र मंडळ (सण नागपंचमीचा).

**जिवंत देखावे, सोशल मिडीया व आधुनिक तंत्रज्ञान :** प्रथम क्रमांक – सिद्धेश्वर तरुण मंडळ (अफजल खानाचा वध), द्वितीय क्रमांक (विभागून) – जयहिंद तरुण मंडळ (अंधरुन पाहून पाय पसरावे) व सुभाषचंद मित्र मंडळ (व्यसन एक विनाश), तृत्तीय क्रमांक (विभागून) – दोस्ती तरुण मंडळ मंडळ (वेड सेल्फीचं) व संगम तरुण मंडळ (बाप लेक).

गणेश विसर्जन मिरवणुकीत मराठमोळी संस्कृतीची जपवणूक, समाज प्रबोधनपर, शिस्तबध्द व पारंपारिक पध्दतीने मिरवणूक : प्रथम क्रमांक – श्री विशाल गणपती ट्रस्ट, माळीवाडा, द्वितीय क्रमांक – तालयोगी प्रतिष्ठान, सावेडी.

**विशेष पारितोषिके :** रंगसंस्कृती (रांगोळी ग्रुप), सम्राट तरुण मंडळ (भराडगल्ली).

# विमा प्रतिनिधींसाठीचा नवा 'क्लॉ बॅक कायदा' रद्द करा

नगर – १ ऑक्टोबर नंतर एलआयसी कडून काही नवीन विमा योजना जाहीर केल्या. त्यामध्ये विमा प्रतिनिधींना मिळणाऱ्या पहिल्या वर्षाच्या कमिशनमध्ये कपात करून विमाधारकाने घेतलेली विमा पॉलिसी सरेंडर केली तर विमा प्रतिनिधीला मिळालेले सर्व कमिशन वसूल करण्यासाठी नव्याने बनविलेला क्लॉ बॅक हा काळा कायदा रद्द करण्याची मागणी विमा प्रतिनिधींच्या संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.


पुणे येथे एलआयसी विभागीय कार्यालसमोर ऑल इंडिया लि.(आफी) संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करून निवेदन देण्यात आले.

पुणे येथे एलआयसी विभागीय कार्यालयासमोर ऑल इंडिया लि.(आफी) संघटनेच्या पुणे विभाग १ आणि २ तर्फे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात पुणे शहर, पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्ह्यातील विमा प्रतिनिधी एकवटले होते. या आंदोलनात ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स फेडरेशनच्या पश्चिम क्षेत्रीय विमा प्रतिनिधी संघटनेचे अध्यक्ष सुधीर पाध्ये, संघटनेच्या पुणे १ विभागाचे सचिव प्रमोद कुमार छाजेड, पुणे विभाग २ चे सेक्रेटरी रमेश कांबळे, उपाध्यक्ष दिलीप मुंदडा, संघटक सचिव संजय नवघणे, डॉ. सोमनाथ देवकाते, माधव जोशी, तसेच विमा प्रतिनिधी उपस्थित होते.

पुणे विभागीय कार्यालयाला दिलेल्या निवेदनात संघटनेने विविध महत्त्वाच्या मागण्या केल्या. यामध्ये विमा पॉलिसी वरील जीएसटी त्वरित रद्द करावा, विमाधारकांना मिळणाऱ्या बोनसमध्ये वाढ करावी, विमा प्रतिनिधींना मिळणाऱ्या कमिशन, मेडिक्लेम, ग्रॅज्युटीमध्ये वाढ करावी तसेच सर्वसामान्य उमेदवारांना पॉलिसी घेण्यासाठी पहिल्याप्रमाणेच एक लाखाची पॉलिसी चालू असावी आदी मागण्या मान्य न झाल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा यावेळी राज्यातून आलेल्या विमा प्रतिनिधींनी दिला.

धरणे आंदोलनात रणजीत डांगे, अजय भंडारी, प्रशांत तरडे, मधुकर जठार, जयप्रकाश शहा, रामनाथन, महेश गुगळे, गणेश रजपूत, मनमोहन राज पुरोहित, हरीश अण्णम, नंदकिशोर खिरोडे, वसुधा जोशी, मीना भंडारी, संदीप साखरे, अशोक सुरा, राहेल वागळेकर, कदिर बेपारी, श्रीमती शितल गोरे यांनीदेखील सहभाग नोंदविला.

# विजय भालसिंग यांना कोल्हापूरचा ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

## आई महालक्ष्मी संमेलनात पुरस्काराने होणार सामाजिक कार्याचा गौरव



नगर – येथील विजय भालसिंग यांना सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रात सुरु असलेल्या निस्वार्थ कार्याबद्दल ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कोल्हापूर येथे २९ डिसेंबर रोजी होणाऱ्या आई महालक्ष्मी संमेलनात चित्रपट अभिनेते संजय खापरे व उद्योजिका पूनम मोरे यांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संमेलनाचे स्वागत अध्यक्ष व निमंत्रक प्रा.डॉ. बी.एन. खरात, स्वप्नपूर्ती फाउंडेशनचे डॉ. मोहन गोखले यांनी दिली.

समृद्धी प्रकाशन, स्वप्नपूर्ती फाउंडेशन, जिद्द फाउंडेशन, वेद फाउंडेशन, स्वामी इंटरप्राईजेसच्या संयुक्त विद्यमाने शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे आई महालक्ष्मी संमेलन कोल्हापूर २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात पुरोगामी विचाराने निस्वार्थ कार्य करणाऱ्यांचा सन्मान होणार आहे.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात विजय भालसिंग गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहे. मुळगाव वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बॅकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे कार्यरत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने योगदान देत आहे. उन्हाळ्यात पशु–पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु–पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना कोल्हापूर येथील मानाचा ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत देण्याची कार्यवाही करावी

## केंद्रीय निबंधक कार्यालयाचे अवसायकांना आदेश

नगर – नगर अर्बन बँकेचा बँकिंग परवाना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रद्द केल्याने गेल्या ३६ महिन्यांपासून ठेवीदारांच्या कोट्यवधी रूपयांच्या ठेवी बँकेत अडकल्या आहेत. ठेवीदारांना प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावर ॲड.साईदीप अग्रवाल यांनी जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांना ठेवीदारांच्या ठेवींपैकी ८० टक्के रक्कम परत मिळण्याबाबत पत्र दिले. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांच्या सहीने केंद्रीय निबंधकांना पत्र पाठवले. त्याची दखल घेत केंद्रीय निबंधक रवीकुमार अग्रवाल यांनी नगर अर्बन बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांना पत्र पाठवून सर्व ठेवीदारांना ठेवीच्या ५० टक्के रक्कम नियमाप्रमाणे परत देण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे बँकेच्या ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. ९ डिसेंबर रोजी केंद्रीय निबंधकांनी सदर आदेशाचा ईमेल अवसायक गायकवाड यांना पाठवला आहे.

केंद्रीय निबंधकांसमोर म्हणणे मांडताना ॲड.साईदीप अग्रवाल यांनी बँकेची आर्थिक स्थिती ८० टक्के ठेवीची रक्कम परत देण्यायोग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर केंद्रीय निबंधकांनी ठेवीची ५० टक्के रक्कम परत देण्याचा आदेश पारित करीत उर्वरित रक्कमही लवकरात लवकर देण्याबाबत कार्यवाही करण्याचे सांगितले. बँकेने प्रभावी कर्ज वसुली जलदगतीने करून ठेवीदारांचे सर्वच्या सर्व पैसे परत दिल्यानंतर बँकेत कमीत कमी ५० कोटी रुपये शिल्लक राहिल्यास बँकेचा रद्द परवाना पूर्ववत चालू करण्यास मदत करण्याचे आश्वासनही केंद्रीय निबंकांनी दिले आहे. बँकेच्या ठेवीदारांना ५० टक्के म्हणजेच एकूण १८१ कोटी रूपये परत मिळणार आहे.

या निर्णयामुळे ठेवीदारांमध्ये आनंद निर्माण झाला आहे. जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, केंद्रीय निबंधक रविकुमार अग्रवाल, सूर्यप्रताप सिंग यांचे ॲड.साईदीप अग्रवाल यांनी आभार मानले आहेत. या निर्णयामुळे बँक पुन्हा त्याच दिमाखात चालू होवू शकते अशा आशा पल्लवीत झाल्या आहेत. बँकेचे सभासद, खातेदार, ठेवीदार, व्यापारी यांच्यासाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे.

ॲड. साईदीप अग्रवाल यांनी बँकेची आर्थिक स्थिती केंद्रीय निबंधकांसमोर मांडली. बँकेला कर्जदारांकडून व्याजासह ८८० कोटी रूपये येणे आहे.बँकेला डीआयसीजीसी विमा कंपनीला १८० कोटी रुपयांचे देणे आहे. बँकेला ठेवीदारांना २७० कोटी रुपये परत द्यायचे आहेत. बँकेकडे आज रोजी शिल्लक रक्कम ३६० कोटी रुपये असून बँकेच्या स्वमिळकतीची बाजारभावाप्रमाणे किंमत ७५ कोटी रुपये आहे. सर्व ठेवीदारांना ठेवी परत करण्यासाठी बँकेला ९५ कोटी रुपये कमी पडत आहेत. सर्व ठेवीदारांची ठेवीची रक्कम परत दिल्यानंतर आणि १०० टक्के कर्ज वसुली झाल्यावर बँकेकडे ८६५ कोटी रुपये शिल्लक राहतील अशी आकडेवारी ॲड.अग्रवाल यांनी सादर केली आहे. बँकेची आर्थिक स्थिती चांगली असून सुरळीत होवू शकते. बँकेने एकही बेनामी कर्ज दिलेले नाही. सर्व कर्ज सुरक्षित असून कर्जापोटी बँकेने कर्जदारांच्या मिळकती नोंदणीकृत गहाणखताव्दारे घेतलेल्या आहेत. तब्बल १२०० कोटी रुपयांच्या मिळकती बँकेकडे गहाण आहेत. सर्व कर्जदारांच्या मिळकतीवर बँकेचे नाव असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावरून बँक पुनर्वरात सुरु करण्याकरीता कोण प्रामाणिक प्रयत्न करीत आहे हे सिद्ध होत आहे. ॲड. साईदीप अग्रवाल हे बँकेचे माजी चेअरमन राजेंद्रकुमार अग्रवाल यांचे चिरंजीव आहेत.

# कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो पकडला

## ५ जनावरांची पोलिसांनी केली सुटका, केडगाव बायपास रोडवरील कारवाई

नगर – कत्तल करण्यासाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांच्या पथकाने पकडून ५ जनावरांची सुटका केली आहे. केडगाव बायपास रोडवर कांदा मार्केट समोर शनिवारी (दि.२१) पहाटे ही कारवाई करण्यात आली आहे.

कोतवाली पोलिस केडगाव भागात गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की, पुणे नगर रोडने केडगाव बायपासकडुन नगर शहराकडे एक महिंद्रा बोलेरो पिकअप टेम्पो ( क्र.एम एच १६ ए वाय २८३६) मध्ये गोवंश जनावरे भरुन कत्तलीसाठी घेवुन जात आहेत. पोलिस त्या वाहनाचा शोध घेत असताना पहाटे ४.३० च्या सुमारास कांदा मार्केट समोर, केडगाव बायपास रोड कडुन केडगावच्या दिशेने एक पिकअप टेम्पो येताना दिसल्याने पोलिसांनी तो अडवला. त्या वाहनचालकाने त्याचे नाव असद गफुर शेख (वय ३५, रा.वाळकी, ता नगर) असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर टेम्पोची पाहणी केली असता त्यात ४ गायी व वासरे आढळून आली. ती कत्तलीसाठी घेवुन जात असलेबाबत त्याने सांगितले. पोलिसांनी टेम्पोतील ८५ हजार रुपये किमतीच्या ४ गायी व ५ हजार रुपये किमतीचे १ वासरु, ४ लाख रुपये किमतीचा बोलेरो पिकअप असा ४ लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो.कॉ. सतिष दळवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन असद शेख याचे विरुध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम (सुधारणा) सन १९७६ चे कलम ५ (अ), १ सह प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ व मो वा का ६६ (१), १९२प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास पोलिस हवालदार गाजरे हे करित आहेत.

## जाहीर खुलासा

संजय मच्छिंद्र शिदोरे व इतर १ यांनी ॲड. समिर वखारे अहमदनगर यांनी दैनिक नवामराठा मध्ये दिनांक ०९/१२/२०२४ रोजी दिलेल्या जाहिर प्रकटनास खुलासा की, तुमचे जाहिर प्रकटनामध्ये वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलाचे मालकी वहिवाटीची व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिल सुनिल गुलाबराव राऊत व इतर हे मेहनत मशागत करून सालासाल पिके घेत आहेत. सदर मिळकतीशी तुमचा काहीएक संबंध कधीही नव्हता व नाही. केवळ तथाकथीत दस्त क्र. ७७४ / १९७२ चा गैरफायदा घेवून खोटे नाटे व दिशाभूल करणारे जाहिर प्रकटन प्रसिध्द केले आहे. सदरचे प्रकटनामध्ये तुम्ही आमचे अशिलाचे नावे मिळकत असल्याचे कबूल केलेले आहे. वास्तवीक पाहाता तुमचा सदर मिळकतीमध्ये कुठलाही कायदेशिर हक्क व अधिकार प्राप्त झालेला नाही. केवळ मुदतबाह्य तथाकथीत दस्ताचे आधारे जाहिर प्रकटनामध्ये नमुद केलेली मिळकतीमध्ये अधिकार दाखविण्याचा प्रयत्न करीत आहात. त्याचप्रमाणे तुमचे पूर्व हक्कदार मच्छिंद्रनाथ नाथूजी शिदोरे यांनी रे. मु. नंबर ३६७/१९८९ चा दावा आमचे अशिलाचे पूर्व हक्कदारावर तथाकथीत दस्ताचे आधारे मालक ठरवून मिळणेसाठी अहमदनगर येथील मे. सिव्हील जज्ञ साहेब, सिनीयर डिव्हीजन येथे दाखल केलेला होता. परंतु सदरचा दावा हा दि. ०१/०९/१९९५ रोजी मे. कोर्टाने त्यांचे हूकूमाची पुर्तता केली नाही म्हणून डिसमीस फॉर डिफॉल्ट केलेला आहे. त्यानंतर तुमचे पूर्वहक्कदारानी सदरचा दावा फैलावर घेणेसाठी चौकशी अर्ज नंबर २१०/१९९५ चा दाखल केलेला होता. परंतु सदरच्या अर्जामध्ये नि. १९ वर त्यांनी पुरसिस दाखल करून त्यामध्ये परस्पर आपआपसात तडजोड झाल्याचे मान्य करून सदरचा चौकशी अर्ज चालविणे नाही असे मान्य व कबूल करून सदरचा अर्ज विनाअट व विनाशर्त काढून घेतला. त्याप्रमाणे मे. कोर्टाने सदरचा अर्ज क्र. २१०/१९९५ मधील नि. १ वर दिनांक १५/०१/१९९९ रोजी आदेश पारीत केला कि, अर्ज अर्जदाराला चालवीणे नाही त्यामुळे सदरचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. अशा रितीने तुमचे पूर्व हक्कदार यांनी सदर तथाकथीत दस्ताबाबतचे आपले हक्क व अधिकार कायम स्वरूपी सोडून दिलेले आहेत. म्हणूनच त्यांनी तशी आमचे अशिलाचे पूर्व हक्कदाराबरोबर तडजोड केली त्यामुळे त्यांचा वाद कायम स्वरूपी मिटला आहे. त्यानंतर त्यांनी सदर मिळकतीबाबत कधीही तक्रार केली नाही. तसेच तुम्ही जाहिर प्रकटनामध्ये कथन केलेप्रमाणे सदर मिळकतीची विक्री करू नये असे नमुद केलेले आहे ते आमचे अशिलास कबूल नाही. कारण आमचे अशिलास सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा कायदेशिर अधिकार होता व आहे. तुमचे पूर्व हक्कदारांनी सदर मिळकतीबाबतचा त्यांचा हक्क समजून उमजून सोडून दिलेला आहे. आता तुम्हाला ५० वर्षापेक्षा जास्त कालावधी नंतर सदर मिळकतीबाबत कोणतेही हक्क सांगता येणार नाहीत जे तुमचे पूर्व हक्कदारांनी सोडून दिलेले आहेत. येणेप्रमाणे जाहिर प्रकटनास जाहिर खुलासा असे.

अहमदनगर
दि. २१/१२/२०२४

**सुनिल गुलाबराव राऊत व इतर यांचेतर्फे**
**ॲड. अशोकराव लक्ष्मणराव बऱ्हाटे पा.**
'पुण्याई', समर्थ डेअरी, पोस्ट कॉलनी समोर,
सिव्हील हडको, अहमदनगर
मो.नं. ९८२२२५९५४८

# झेंडीगेट येथील मटन दुकानात गोमांसची विक्री; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – गोवंश जनावरांची कत्तल करण्यास शासनाची मनाई असताना बेकायदेशीर रित्या गोवंश जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत ४०० रुपयांचे २ किलो गोमांस जप्त केले. ही कारवाई झेंडीगेट परिसरातील कारी मस्जीद जवळ शुक्रवारी (दि २०) दुपारी १.३० च्या सुमारास करण्यात आली.

कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की, कारी मस्जीद जवळ एका मटन दुकानात तौसीफ कुरैशी हा गोमांस विक्री करीत आहेत. ही माहिती मिळताच पोलिस त्या ठिकाणी कारवाईसाठी जात असताना एका मटन दुकानाचे समोरुन काही इसम हे दुचाकीवरुन काळ्या रंगाचे पिशवीतून मटन घेवुन जाताना दिसले, त्या दुकानात मटन विक्री सुरु असल्याचा संशय बळावल्याने पोलिसांनी अचानक छापा टाकला असता, दुकानातील दोघेजण पोलिसांची चाहुल लागल्याने पळून गेले. त्याचा पाठलाग केला परंतु तो परिसर हा गर्दीचा व दाट लोक वस्तीचा असल्याने ते मिळुन आले नाही. पोलिसांनी दुकानाचे आजुबाजुला दुकानातुन पळून गेलेल्या इसमाची नाव पत्ते विचारले असता त्याची नावे सोहेल जावेद कुरेशी, तौसीफ जावेद कुरेशी (रा. झेंडीगेट) असे असल्याचे समजले. पोलिसांनी दुकानातून ४०० रुपये किमतीचे गोमांस जप्त केले.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी सोहेल कुरेशी, तौसीफ कुरेशी यांच्या विरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, महाराष्ट्र प्राणी रक्षा अधिनियम सन १९९५ चे सुधारीत सन २०१५ चे कलम ५ (क), ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलिस हवालदार संदिप पितळे, पो.कॉ.दिपक रोहकले, तानाजी पवार, सुरज कदम, सुजय हिवाळे यांनी केली.



आनंदऋषीजी मेडिटेशन सेंटरमध्ये मेडिटेशनचा दीपप्रज्वलनाने शुभारंभ करताना आमदार संग्राम जगताप. समवेत नितीन थाडे, सुभाष गर्जे, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. आशीष भंडारी, रोटरीचे रविंद्र व अनघा राऊत, दीपक गुजराथी, आदी ठोंबे, प्रसाद सितवाडे आदी.

# वैयक्तिक व जागतिक शांतीसाठी मेडिटेशन आवश्यक

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; जागतिक ध्यान दिवस उत्साहाने साजरा

नगर – आज जागतिक ध्यान दिवस जगातील १९७ देशात साजरा केला जात आहे. आपल्या भारत देशाची जगाला दिलेली ही देणगी आहे. मेडिटेशनमुळे मन शांत होते, निर्णय क्षमता वाढले, वाद कमी होतात, सामाजिक स्तरावर एकता निर्माण होण्यास मदत होते व त्याचीच आज गरज आहे. वैयक्तिक व जागतिक शांतीसाठी मेडिटेशन आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन जीवनात त्याचा वापर झाला पाहिजे, असे उद्घाटनपर भाषणात आमदार संग्राम जगताप म्हणाले

येथील रोटरी क्लब ऑफ अहित्यानगर, आनंदऋषिजी हॉस्पिटल व ब्रह्माकुमारीज संस्थेच्या वतीने आनंदऋषिजी मेडिटेशन सेंटर मध्ये जागतिक मेडिटेशन दिवसाचे औचित्य साधुन संघटित मेडिटेशन करण्यात आले. त्याचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. सदर प्रसंगी मेडिटेशनची विधी–सिध्दी व प्रभाव या विषयी डॉ. सुधा कांकरियांनी माहिती सांगुन राजयोगा मेडिटेशनचा विशेष अभ्यास करून घेतला. या वेळेस रोटरीचे अध्यक्ष नितीन थाडे, सचिव सुभाष गर्जे, आनंदऋषिजी हॉस्पिटलचे ट्रस्टी डॉ. प्रकाश कांकरिया, प्रशासकीय अधिकारी डॉ. आशीष भंडारी, रोटरीचे रविंद्र व अनघा राऊत, दीपक गुजराथी, आदी ठोंबे, आनंदऋषिजी नर्सिंग कॉलेजचे प्रिन्सीपल प्रसाद सितवाडे आदी उपस्थित होते.

सुरूवातीस आमदार संग्राम जगताप यांचा रोटरीच्या वतीने नितीन थाडे यांच्या हस्ते 'शांतीदूत' बहुमान देऊन सन्मान करण्यात आला. आनंदऋषिजी हॉस्पिटलच्या वतीने ट्रस्टी डॉ. प्रकाश कांकरिया व डॉ. आशीष भंडारी यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन आमदार संग्राम जगताप यांचा सत्कार केला.

मनोगत व्यक्त करतांना रोटरीच्या शांतता कमिटीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की, मेडिटेशनमुळे आंतरीक शांतता, जागतिक शांतता–एकता निर्माण होण्यास मदत होते. आजच्या दिवशी सगळ्या जगात करोडो व्यक्ती संघटित मेडिटेशन करीत आहेत. त्यामुळे मधुर शांतीची व्हायब्रेशन्सची सकारात्मक लाट सगळया विश्वात पोहचत आहे. ही आनंदाची बाब आहे असे सांगुन त्यांनी 'शांतीकी शक्तीसे शांती जगमें लाना है' या थीमवर मेडिटेशन करवून घेतले. सुभाष गर्जे यांनी आभार मानले.

# भारतीय सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी

मुंबई – भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना कम्बाईंड डिफेन्स सर्विसेस (CDS) या परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण दिले जाते. नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील युवक व युवतीसाठी २० जानेवारी २०२५ ते ४ एप्रिल २०२५ या कालावधीत सी.डी.एस. (CDS) प्रशिक्षणाचे क्र. ६४ आयोजन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात निशुल्क प्रशिक्षणासह, निवास व भोजन उपलब्ध असेल, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाच्या संधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे ६ जानेवारी २०२५ रोजी मुलाखतीस सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत हजर रहावे. Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवरील सी.डी.एस.–६४ कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट संपूर्ण माहितीसह आणावी.

सी.डी.एस. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खालील नमूद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावे.

उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी. डी. एस. (CDS) या परीक्षेकरिता ऑनलाईनद्वारे अर्ज केलेला असावा.

अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी training.pctcnashikgmail.com व दूरध्वनी क्र. ०२५३–२४५१०३२ किंवा व्हॉट्सॲप क्र. ९१५६०७३३०६ (प्रवेश मिळविण्यासाठी) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष किंवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांनी केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

